रायगड, नवी मुंबई

◆ वर्ष १७ ◆ अंक २९५

www.ramprahar.com

# राम प्रहर

मंगळवार, १३ मे २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२


## अंतरंग


आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने विकासकामे/३

नवी मुंबईतील नागरिकांना पाणीपुरवठ्याबाबत आवाहन/६

विराट कोहलीचा कसोटी क्रिकेटला अलविदा!/८


## दहावीच्या परीक्षेचा आज ऑनलाईन निकाल



**मुंबई :** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर, अमरावती, नाशिक, लातूर व कोकण या नऊ विभागीय मंडळांमार्फत फेब्रुवारी-मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ. १० वी) परीक्षेचा निकाल मंडळाच्या कार्यपध्दतीनुसार अधिकृत संकेतस्थळांवर मंगळवारी (दि.१३) दुपारी १ वाजता ऑनलाईन जाहीर करण्यात येत असल्याचे मंडळाचे सचिव देविदास कुलाळ यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे. यासाठी 1. https://results.digilocker.gov.in; 2. https://sscresult.mahahsscboard.in; 3. http://sscresult.mkcl.org; 4. https://results.targetpublications.org हे अधिकृत संकेतस्थळांचे पत्ते आहेत.

# यापुढे केवळ दहशतवाद व 'पीओके'वरच पाकिस्तानशी चर्चा -पंतप्रधान मोदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नियोजित वेळेनुसार सोमवारी (दि.१२) रात्री ८ वाजता देशवासीयांशी संवाद साधला. त्यामध्ये, भारत पाकिस्तान युद्धजन्य परिस्थिती आणि ऑपरेशन सिंदूरवर भाष्य करताना भारतीय सैन्य दलाच्या शौर्याला सलाम केला. या वेळी त्यांनी यापुढे पाकिस्तानसोबत चर्चा झाली तर फक्त पाकव्याप्त काश्मीरवर आणि दहशतवादावरच होणार असल्याचा इशारा दिला.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, यापुढे पाकिस्तानच्या अणवस्त्रांच्या धमकीला घाबरणार नाही, त्याच्यावर जोरदार कारवाई होणार असल्याचा इशाराही नरेंद्र मोदी यांनी दिला.

ते पुढे म्हणाले की, ऑपरेशन सिंदूरची कारवाई फक्त स्थगित केली आहे, पण थांबवली नाही. यापुढे पाकिस्तानने दहशतवाद्यांना पाठिंबा देणे थांबवले नाही तर भारत पूर्ण शक्तिने हल्ला करणार. भारतावर जर यापुढे दहशतवादी हल्ला झाला तर जशास तसे उत्तर दिले जाणार हे ऑपरेशन सिंदूरमुळे स्पष्ट झाले. यापुढे पाकिस्तानचे न्यूक्लिअर ब्लॅकमेल सहन करणार नाही. त्या धमकीच्या आडून दहशतवाद्यांना पोसणाऱ्यांना सोडणार नाही. दहशतवादी आणि त्यांना पोसणाऱ्यांना वेगवेगळ्या दृष्टीने पाहणार नाही. दोघांवरही कारवाई करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

ज्यांनी आमच्या बहिणींचे कुंकू पुसले त्याचा बदला भारताने घेतला. मेड इन इंडिया शस्त्रांनी त्याची ताकद दाखवली. हवाई हल्ले असो वा पर्वतीय प्रदेश, प्रत्येक ठिकाणी भारतीय बनावटीच्या शस्त्रांनी त्याची क्षमता सिद्ध केली. भारताच्या जोरदार हल्ल्यांमुळे बिथरलेल्या पाकिस्तानने शस्त्रसंधीची याचना केली. तोपर्यंत भारताने आपले लक्ष्य साध्य केले होते. त्यामुळे आम्ही शस्त्रसंधी केली.

## मुंबईसह राज्यातील संवेदनशील भागात खबरदारी घेणार -मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई :** भारत-पाकिस्तान दरम्यान तणाव निवळला असला तरीही भारतावरील धोका अद्याप शमलेला नाही. त्यामुळे महाराष्ट्र सरकारने भारतीय लष्कराबरोबर सोमवारी (दि.१२) बैठक घेतली. या बैठकीत गुप्तचर माहितीचे आदानप्रदान, तंत्रज्ञानाचा अधिकाधिक वापर आणि आवश्यक खबरदारी यासह राज्याच्या संवेदनशील भागात अधिकाधिक खबरदारी घेण्याचा निर्धार करण्यात आला.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आपण जिंकू शकत नाही हे पाकिस्तानला माहिती आहे. त्यामुळे ते प्रॉक्सी वॉर सुरू करतात. त्यातून वेगवेगळ्या प्रकारच्या कारवाया घडवून आणण्याचा प्रयत्न करतात. मुंबई देशाची आर्थिक राजधानी असल्यामुळे संवेदनशील आहे. त्या दृष्टीने काय खबरदारी घ्यायला हवी, यासाठी आजची बैठक आम्ही घेतली.

# ...तर रामबागच्या कारवाईविरोधात ग्रामस्थ जनआंदोलन करणार




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावेखाडी परिसरात पंचक्रोशीतील नागरिकांसाठी उभारण्यात आलेली निसर्गरम्य आणि देखणी रामबाग आता सिडकोच्या कारवाईच्या छायेत सापडली आहे. काही लोकांच्या व्यक्तिगत स्वार्थासाठी ही बाग उध्वस्त करण्याचा घाट सिडकोकडून घातला जात असल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाची लाट उसळली असून त्यांनी या कारवाईला तीव्र विरोध करण्याचा आणि वेळ पडल्यास जनआंदोलन उभारण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.

चिखलात जसे कमळ फुलावे त्याप्रमाणे न्हावेखाडीमध्ये पंचक्रोशीतील नागरिकांसाठी सुंदर आणि निसर्गरम्य रामबाग उभारली गेली आहे, मात्र काही लोकांच्या वैयक्तिक कारणासाठी रामबागेवर तोडक कारवाई करण्याचे संकेत मिळाल्याने या कारवाईला प्रखर विरोध करण्याचा ठाम निर्णय न्हावे व गव्हाण विभागातील ग्रामस्थांनी घेतला असून तसा पुकार त्यांनी दिला आहे. लोकांच्या हितासाठी उभारलेली रामबाग अबाधित रहावी यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेतला आहे. त्यामुळे शेकडो ग्रामस्थांनी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेऊन तोडक कारवाई थांबवावी, अशी विनंती वजा मागणी केली आहे.

या वेळी ग्रामस्थांची आमदार प्रशांत ठाकूर यांच्या सोबत झालेल्या बैठकीत आमदार प्रशांत ठाकूर यांनी ग्रामस्थ जो निर्णय घेतील त्या निर्णयाच्या पाठीशी असल्याचे जाहीर केले. **(पान २ वर..)**

### निसर्गसंपत्तीचे रक्षण करण्याचा ग्रामस्थांचा निर्धार

न्हावे व गव्हाण विभागातील ग्रामस्थांनी एकत्र येत या निर्णयाला विरोध दर्शवला असून भविष्यात मोठे जनआंदोलन उभे करण्याचा इशाराही दिला आहे. निसर्गसंपत्ती व स्थानिक हिताचे रक्षण करण्यासाठी आम्ही शेवटच्या श्वासापर्यंत लढू, असा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. या पार्श्वभूमीवर सिडको प्रशासनाने नागरिकांच्या भावना लक्षात घेऊन तोडक कारवाईचा पुनर्विचार करावा, अशी मागणीही ग्रामस्थांनी केली असून कारवाई केल्यास कारवाई विरोधात जनआंदोलन करण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**"रामबाग अतिशय सुंदर आणि लोकांची बाग आहे. या ठिकाणी लहानग्यांपासून वृद्धापर्यंत हजारोंच्या संख्येने लोक निसर्गाचा आनंद घेत असतात आणि ही लोकांची संपत्ती हिरावून घेण्याची धमकी सिडको देत आहे. त्यामुळे ग्रामस्थांनी प्रखर विरोध करण्याचा निर्णय घेतला आहे. तोडक कारवाई होऊ नये यासाठी वेळ पडल्यास १९८४ प्रमाणे लढा देण्याचा निर्धारही केलाय.**
**-अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते**

## देशविरोधी पोस्टप्रकरणी पेणच्या युवकाला अटक

**पेण : रामप्रहर वृत्त**



देशविरोधी मेसेज सोशल मीडियावर टाकून दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणाऱ्या पेणमधील मोसिन मुजावर याला सोमवारी (दि.१२) पहाटे नवी मुंबईतून अटक करण्यात आली. मोसिन मुजावरला तुर्भे रेल्वे स्टेशनमधून ताब्यात घेण्यात आले, अशी माहिती पेण पोलिसांनी दिली. पेण पोलीस उपविभागीय अधिकारी गजानन टोंपे यांच्या मार्गदर्शनाखाली पेण पोलिस ठाण्यांच्या पथकाने तांत्रिक तपास करत मोसिनचा शोध घेतला.

पेणमधील मोसिन मुजावर या तरुणाने ३ एप्रिल रोजी दुपारी पावणेबाराच्या सुमारास भारताविरोधी चिथावणीखोर पोस्ट केली. सोशल मीडियावर ही पोस्ट व्हायरल झाल्यानंतर आयुष किरण शहा, पेण यांनी सह्याद्री प्रतिष्ठान हिंदुस्थानचे अध्यक्ष साईराज कदम यांच्याशी चर्चा करून ९ मे रोजी पेण पोलिसांकडे फिर्याद दाखल केली. पोलिसांनी त्याची सोशल मीडियावरील पोस्टची खात्री केल्यानंतर मोसिनविरोधात गुन्हा दाखल केला. **(पान २ वर..)**

## विहीरीत विष टाकल्याचा संशयकल्लोळ; तिघांवर गुन्हा

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील ताडगाव गावाचे सार्वजनिक विहीरीवर काहीतरी टाकल्याचा संशयावरून एकास ग्रामस्थांनी हटकले, याबाबत पोलिसांना पाचारण करून त्या व्यक्तीस ताब्यात दिले, परंतु साळाव ते ताडगावपर्यंत विहीरीत विष टाकले, अशा संशयकल्लोळाने पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी रेवदंडा पोलिस ठाणेकडे धाव घेतली.

पोलिसांनी सुयोग्य तपास करून अंधश्रध्दा व जादूटोण्याच्या माध्यमातून मंतरलेले ताबीज बांधलेल्या विटा साळाव ते ताडगाव मधील सार्वजनिक विहीरीत टाकून सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराहट व दहशत निर्माण केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

**(सविस्तर वृत्त ५ वर)**

## निवडक

### म्हाडाकडून जुलैमध्ये ४००० घरांची लॉटरी




**मुंबई :** म्हाडा लवकरच चार हजार घरांसाठी लॉटरी काढणार आहे. ही लॉटरी जुलै महिन्यात निघणार आहे. या लॉटरीमध्ये ठाणे आणि कल्याणमधील घरांचा समावेश असणार आहे. विशेष म्हणजे, यापैकी १००० हून जास्त घरे ही ठाण्यातील चितळसरमध्ये आहेत. कल्याणमध्येदेखील म्हाडाला तब्बल २५०० घरे मिळणार आहेत. तसेच, म्हाडाला हाउसिंग स्टॉकमधून मिळालेल्या घरांचाही समावेश असणार आहे.

### शेअर बाजारात सुपर मंडे! सेन्सेक्स, निफ्टीमध्ये वाढ

**मुंबई :** भारत आणि पाकिस्तानमध्ये झालेल्या शस्त्रसंधी आणि अमेरिका-चीनमध्ये सुरू असलेल्या टॅरिफवरील चर्चेचा सकारात्मक परिणाम भारतीय शेअर बाजारावर झाल्याचे दिसून आले. शेअर बाजाराच्या सेन्सेक्समध्ये ३.७४ टक्के तर निफ्टीमध्ये ३.८२ टक्क्यांची वाढ झाली. सोमवारी शेअर बाजारातील ३,२३६ शेअर्समध्ये मोठी वाढ झाली तर ४४८ शेअर्समध्ये काहीशी घसरण झाल्याचे दिसून आले.




**पनवेल : महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांनी कळंबोलीमधील पावसाळ्यापूर्वीची नालेसफाई आणि होल्डिंग पॉईंट तसेच पंपिंग स्टेशनची सोमवारी पाहणी केली. या पाहणी दौऱ्यात परेश ठाकूर यांनी महापालिकेच्या अधिकाऱ्यांना विशेष सूचना केल्या. या वेळी भाजप कळंबोली मंडळ अध्यक्ष अमर पाटील, माजी अध्यक्ष रविनाथ पाटील, माजी नगरसेवक गणेश कडू, बबन मुकादम, रवींद्र भगत, रवी पाटील, जिल्हा चिटणीस संदीप म्हात्रे, प्रभाग अधिकारी अरविंद पाटील आदी उपस्थित होते.**

# कर्मवीर अण्णांची भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे सातारा येथे प्रतिपादन

**सातारा : रामप्रहर वृत्त**



कितीही मोठे झालो तरी जुन्या दिवसांचा विस्मरण होऊ नये कारण तेच दिवस आपल्या आयुष्यातील महत्त्वाचे दिवस असतात, त्यामुळे कर्मवीर अण्णांची शिकवण असलेली हि भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सातारा येथे केले.

रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुण्यतिथीचे औचित्य साधून छत्रपती शिवाजी कॉलेजच्या कमवा व शिका योजना माजी विद्यार्थी स्नेहमेळावा छत्रपती शिवाजी कॉलेज सातारा येथे माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. त्यावेळी मार्गदर्शन करताना ते बोलत होते.


लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा रयत शिक्षण संस्थेच्या विकासात मौल्यवान वाटा राहिला आहे. त्यांनी या संस्थेच्या कमवा व शिका योजनेत शिक्षण घेतले. नेहमीच माजी विद्यार्थी म्हणून रयत शिक्षण संस्थेचा आदर उराशी बाळगून आहेत. त्यामुळे यावेळी कमवा व शिका योजनेतील माजी विद्यार्थ्यांकडून त्यांच्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा उल्लेख असलेला मानपत्र आणि मायेची शाल देऊन सन्मान करण्यात आला. या वेळी मानपत्राचे वाचन होत असताना वातावरण अतिशय अभिमानाने ऊर भरून येणारे होते. टाळ्यांच्या कडकडाट त्याला माजी विद्यार्थ्यांकडून प्रतिसाद दिला जात होता.

या कार्यक्रमाला रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय. टी. देशमुख, शहाजी डोंगरे, माजी प्राचार्य आर. के. शिंदे, कमवा व शिका योजनेचे चेअरमन श्री. देशमुख, माजी उपाध्यक्ष एम. एस. शिंदे, जे. पी. धायगुडे, प्राचार्य राजेंद्र मोरे. धनाजी लेंडवे यांच्यासह माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. **(पान २ वर..)**

# पनवेल फुटबॉल लीग २०२५

## परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महानगरपालिकेचे माजी सभागृह नेते व युवा पिढीचे प्रेरणास्थान परेश ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता युवा मोर्चा खारघरच्या वतीने पनवेल फुटबॉल लीग आयोजित करण्यात आली असून शुक्रवारी (दि.१६) सायंकाळी ५ वाजता या लीगचे भव्य उदघाटन खारघरमध्ये अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. या लीगमधील विजेत्या संघाला ५० हजार रुपये व चषक, द्वितीय क्रमांकाला २५ हजार व चषक आणि तृतीय क्रमांकास १० हजार रुपये व चषक असे मुख्य बक्षिसांचे स्वरूप आहे.

१६ व १७ मे २०२५ रोजी मोठ्या उत्साहात हि स्पर्धा पंडित दीनदयाल उपाध्याय मैदान, सेक्टर ७, खारघर येथे होणार आहे. या लीगमध्ये आठ निवडक संघ आपले कौशल्य सादर करण्यासाठी आणि विजेतेपदासाठी मैदानात भिडणार आहेत. परदेशात फुटबॉल प्रिमिअर लीग खेळली जाते, ती स्पर्धा लहान आयोजनातून उत्तरोत्तर मोठी झाली आणि या स्पर्धेचा जगभर नावलौकिक झाला. आपल्या देशात विशेषतः हा खेळ क्रिकेटप्रमाणे जास्त खेळला जात नाही, मात्र शारीरिक व्यायाम व तंदुरुस्तीच्या बाबतीत हा खेळ गणला जातो. या आयोजनाच्या प्रयत्नातून या खेळाची आवड तरुणाईमध्ये निर्माण झाली पाहिजे, त्यासाठी पनवेल लीगच्या माध्यमातून प्रयत्न होणार आहे.

तरुणांना प्रोत्साहन देणारा आणि एकोपा निर्माण करणारा हा खेळ असल्याने या खेळाचाही प्रसार व प्रचार झाला पाहिजे आणि **(पान २ वर..)**

# बारवई आदिवासीवाडीतील कार्यकर्ते भाजपत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

बारवई ग्रामपंचायत हद्दीतील बारवई आदीवासीवाडी व समतानगर आदीवासीवाडीतील बांधवांनी शेकाप, उध्दव ठाकरे गटाला रामराम करत बारवई ग्रामपंचायत सरपंच अ‍ॅड. नियती बाबरे व निलेश बाबरे यांनी त्यांच्या कार्यकर्त्यांसह भाजपमध्ये जाहिर पक्षप्रवेश केला. आमदार महेश बालदी यांनी सर्व प्रवेशकर्त्यांचे भाजपमध्ये शाल व पुष्पगुच्छ देऊन आभार मानले.

या वेळी आमदार महेश बालदी यांनी भाजप पक्षात प्रवेश केलेल्यांचे स्वागत करून आम्ही कायम आपल्या पाठीशी राहू असे सांगितले. नियती निलेश बाबरे यांच्यासोबत वावेघर ग्रामपंचायतीचे सदस्य निशा नितीन घरत, अमृता मोळी, माजी सदस्य नितीन घरत, अमित माळी, वावेघर येथील युवा कार्यकर्ते अमोल माळी, अभिजित माळी, आदित्य माळी, निखील माळी, दापीवली येथील रूपेश गाताडे, चेतन हातमोडे, बारवई ग्रामपंचायत सदस्य उषा किसन वाघमारे, पंढरीनाथ कातकरी यांनी भाजपमध्ये जाहीर प्रवेश केला. **(पान २ वर..)**



## एसटीमध्ये लवकरच होणार नोकरभरती

**मुंबई :** एसटीला आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी भविष्यात महामंडळाकडून २५ हजार स्वमालकीच्या बसेस घेण्यात येत आहेत. या बसेससाठी आपल्याला मनुष्यबळाची गरज लागणार असून चालक तथा वाहक पदाबरोबरच अन्य काही वर्गातील पदेदेखील येत्या काही वर्षात एसटी महामंडळात भरती केली जाणार आहेत. नुकतीच संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मंजुरी देण्यात आली, अशी माहिती राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी दिली. एसटीतील नोकरभरतीबाबत भविष्यात वाढत्या बस संख्येनुसार कर्मचाऱ्यांच्या नवीन आकृतीबंधाला मंजुरी घेण्यात येईल त्यानुसार पुढील भरती प्रक्रिया राबवण्यात येणार आहे.

# गोमाता संवर्धनाशिवाय नैसर्गिक शेतीला गती नाही -मुख्यमंत्री फडणवीस

## ‘गोवर्धन गोशाळा कोकण’प्रकल्पाचे उद्घाटन

**सिंधुदुर्ग, : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना समृद्ध करण्यासाठी देशी गायींचे संवर्धन महत्त्वाचे असून, गोमातेचे संवर्धन केल्याशिवाय नैसर्गिक शेतीला गती मिळणार नाही, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. सिंधुदुर्ग जिल्ह्यातील करंजे–साटमवाडी (ता. कणकवली) येथे ७० एकर जागेत उभारण्यात आलेल्या गोवर्धन गोशाळा कोकण प्रकल्पाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते पार पडले.



कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, माजी मुख्यमंत्री तथा खासदार नारायण राणे, मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा पालकमंत्री नितेश राणे, माजी मंत्री तथा आमदार दीपक केसरकर, माजी मंत्री तथा आमदार रवींद्र चव्हाण, आमदार निलेश राणे, जिल्हाधिकारी अनिल पाटील, सिंधुदुर्ग शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा नीलम राणे, रवींद्र पाठक, प्रमोद जठार आदी मान्यवर उपस्थित होते.

गोवर्धन गोशाळा कोकण हा प्रकल्प कै. तातू सीताराम राणे ट्रस्टच्या माध्यमातून राबविण्यात आला असून, गावाच्या विकासासाठी गोमातेचे गोमातेचे महत्त्व फार मोठे आहे. गावाच्या विकासासाठी गोमातेचे योगदान केंद्रस्थानी ठेवण्याचा संकल्प या प्रकल्पामागे आहे.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, देशातील एकूण गोशाळांपैकी उत्तम गोशाळा कोकणात तयार झाली आहे. या माध्यमातून एक अर्थव्यवस्था तयार होऊ शकते. शेतकऱ्यांना या गोशाळेच्या माध्यमातून व्यवसायाभिमुख प्रशिक्षण देता येईल, अशी व्यवस्था येथे आहे. विविध प्रकारची उत्पादन केंद्रे आणि कृषी व पशुसंवर्धनाचे पर्यटन केंद्र म्हणून देखील येथे व्यवस्था करण्यात आली आहे. गोमातेचे महत्त्व आपल्या संस्कृतीत फार मोठे आहे. गोशाळा म्हणजे केवळ गायींचे संरक्षण नव्हे, तर ती एक सामाजिक, आर्थिक आणि पर्यावरणपूरक क्रांती आहे. गावाच्या विकासासाठी अशा प्रकल्पांची गरज आहे. सिंधुदुर्ग जिल्हा निसर्गसंपन्न असून, अशा प्रकल्पांमुळे स्थानिकांना रोजगार, शाश्वत शेती आणि नैसर्गिक जीवनशैलीची दिशा मिळेल, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

उपमुख्यमंत्री शिंदे यांनी हा उपक्रम गोमाता संवर्धनासाठीचा मॉडेल प्रकल्प असल्याचे सांगितले. शेतकऱ्यांसाठी हा प्रकल्प दिशादर्शक तसेच मार्गदर्शक ठरेल. निसर्गाची मुक्त उधळण आणि संस्कृतीचा मुक्त ठेवा असलेल्या कोकणात गोमाता संवर्धनासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा ठरेल. शेतकऱ्यांची समृद्धी साधणे हा या प्रकल्पाचा प्रमुख उद्देश आहे. कोकणात धवल क्रांतीचा पाया घातला जात असून, परिसरातील दूधही येथे संकलित केले जाणार आहे. त्यामुळे दूध व्यवसायालाही चालना मिळेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

प्रास्ताविकामध्ये खासदार नारायण राणे यांनी गायींचे विविध प्रकार, त्यांच्या वैशिष्ट्यांची माहिती, तसेच दूध, शेण, मूत्र या नैसर्गिक घटकांपासून मिळणाऱ्या उपयुक्त उत्पादनांबाबत सविस्तर माहिती दिली. ते म्हणाले, येथील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढावे, मुलांना चांगले शिक्षण मिळावे, जिल्ह्यातून चांगले अधिकारी घडावेत व समृद्धी निर्माण व्हावी, हा या प्रकल्पामागील हेतू आहे. गोमाता संवर्धन करून जिल्ह्यातील तरुणांनी शेतीपूरक उद्योगात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

माजी मंत्री तथा आमदार रवींद्र चव्हाण यांनी या प्रकल्पासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमात शाल, श्रीफळ व गोप्रतिमा (गोशाळेचे स्मृतिचिन्ह) देऊन मुख्यमंत्री फडणवीस यांचे स्वागत करण्यात आले. आमदार निलेश राणे यांनी स्वागत केले, तर मंत्री नितेश राणे यांनी आभार मानले. गोवर्धन गोशाळेच्या उभारणीसाठी आवश्यक योगदान दिलेल्या विविध सहभागी व्यक्तींचा सन्मान मुख्यमंत्र्यांच्या हस्ते यावेळी करण्यात आला.

# वीटभट्टी व्यावसायिकांचे अर्थकारण ढासळले

**खोपोली : प्रतिनिधी**

व्यवसायाच्या ऐन हंगामात कोसळलेल्या अवकाळी पावसाने खालापूर तालुक्यातील वीट भट्टी व्यवसायिकाना प्रचंड आर्थिक नुकसान सहन करावे लागत असून फायदा दूर मुद्दल मिळाली तरी समाधान अशी खंत व्यावसायिक बोलून दाखवत आहेत.

खालापूर तालुक्यातील प्रमुख व्यवसायापैकी एक वीट भट्टी व्यवसाय आहे. मुबलक प्रमाणात माती पाणी यामुळे स्थानिक मोठ्या प्रमाणात वीट भट्टी व्यवसायात आहेत. साधारण ८० ते ८५ वीट भट्टी व्यवसायिकाची नोंद शासन दरबारी आहे. झपाट्याने विकसित होत असलेल्या नवी मुंबईच्या वेशीवर खालापूर तालुका असल्याने तालुक्यातील वीटेला मोठ्या प्रमाणात नवी मुंबईत मागणी त आहे. वीट भट्टी मजूर, लागणारे कच्चे मटेरियलचे वाढलेले भाव, मजुरांकडून होणारी फसवणूक आणि त्यात अवकाळीचा फटका यामुळे वीटभट्टी व्यावसायिक जेरीस आले आहेत. मागील आठवड्यात सलग तीन दिवस पडलेल्या अवकाळी पावसाने भट्टीसाठी तयार कच्ची विटेची माती केली आहे. जवळपास आठ ते दहा लाख वीट मातीमोल झाल्याने



### फायद्याचा दिसणाऱ्या या व्यवसायाने कंबरडे मोडले

***चार ते पाच वर्षांपूर्वी १२० वीट भट्टी व्यावसायिक खालापूर तालुक्यात होते .ती संख्या ८० ते ८५ च्या घरात आली आहे. नवी मुंबई ,लोणावळा या भागात खालापूरची वीट पोहचवली जाते. छोटी वीट साधारण ७हजार रुपये हजारी तर ठोकळा वीट १२हजार रुपये हजारी दराने विकली जाते. विटे साठी लागणारा तूस, कोळशाची राख, दगडी कोळसा याचे मागील काही वर्षात वाढलेले प्रचंड दर आणि अनेकदा पैसे घेऊन सुद्धा भट्टीवर न येणारे मजूर यामध्ये वीट भट्टी व्यावसायिक भरडला जात आहे.***

**मजुरांची मोठ्या प्रमाणात कमतरता या व्यवसायाला सध्या भासत असून त्या तयार वीट अवकाळी पावसाने पुन्हा मातीत जात आहे. २०२० पासून या व्यवसायाला उत्तरेकडे लागली असून होणारा नुकसानाची भरपाईची शासन दरबारी तरतूद नसल्याने वीट भट्टी व्यवसायात टिकून राहणे मुश्किल झाले आहे.**

**–रामदास काईनकर**

वीट भट्टी व्यवसायिकांचे प्रचंड आर्थिक नुकसान झाले आहे. कोट्यावधीच्या घरात नुकसान झाले असून निसर्गाने मारले असले तरी त्याची दाद तरी कुठे मागणार असा प्रश्न व्यावसायिकांना पडला आहे.

# एमसीए देणार प्रत्येक जिल्हा क्रिकेट असोसिएशनला ७५ लाख रुपये

**पेण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन च्या वतीने प्रत्येक जिल्ह्यात क्रिकेट खेळासाठी व खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे उद्देश्याने ७५ लाख रुपयाचे अनुदान प्रत्येक जिल्ह्यासाठी देण्यात माहिती एमसीए चे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी पेण येथे आयोजित पत्रकार परिषदेत दिली.

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशन व रायगड क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते तसेच यावेळी अध्यक्ष रोहित पवार यांनी पेणमधील छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियमची पाहणी केली व खेळाडूंची भेट घेऊन त्यांना शुभेच्छा दिल्या.

या प्रसंगीआमदार रवीशेठ पाटील, मा.आमदार अनिकेत तटकरे, महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सहसचिव संतोष बोबडे, रायगड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष अनिरुद्ध पाटील, मा. नगराध्यक्षा प्रितम पाटील, अपेक्स कौन्सिल सदस्य राजू काणे, सुशील शेवाळे, अजय देशमुख, मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य जोशी, सचिव प्रदीप नाईक, जितेंद्र ठाकूर, उद्योजक राजू पिचिका, रायगड रॉयल्स संघमालक अलीशा बाहेती, रायगड रॉयल्स संघाचे संचालक पराग मोरे, आनंद जाधव, मा. उपनगराध्यक्ष दिलीप लाड, मा. उपनगरध्यक्ष वसुधा पाटील, रायगड रॉयल्स पुरुष व महिला संघाचे कर्णधार ऋषभ राठोड व किरण नवगिरे, तसेच संघटनेचे पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मे महिना अखेरीस होऊ घातलेल्या महाराष्ट्र प्रीमियर लीग वुमेन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग या स्पर्धांमध्ये रायगड रॉयल्स चा संघ सहभागी होणार आहे. या स्पर्धांमागची भूमिका, त्यामुळे महाराष्ट्र क्रिकेटला होणारा फायदा, संघमालकांची भूमिका, रायगड क्रिकेट असोसिएशन करत असलेले काम या या विषयी महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष रोहित पवार यांनी पत्रकारांना माहिती दिली. तसेच रायगड जिल्ह्यात पायाभूत सुविधांचा विकास करण्यासाठी



एमसीए सर्वोतोपरी प्रयत्न करत आहे तसेच येणाऱ्या काळात जिल्हा क्रिकेट असोसिएशनला अजून भरीव निधी उपलब्ध करून देणार आहे. पायाभूत सुविधांचा अजून विकास करण्यासाठी एमसीए कटिबद्ध असून रायगड क्रिकेट संघटनेला सर्वोतोपरी मदत करणार असल्याचे एमसीएचे संघटनेचे अध्यक्ष आमदार रोहित पवार यांनी सांगितले.

पुढे बोलताना म्हणाले कि, महाराष्ट्र प्रीमियर लीग या स्पर्धेमुळे राज्याच्या कानाकोपऱ्यात असलेल्या गुणवान क्रिकेटपटुंना राष्ट्रीय स्तरावर येण्यासाठी संधी मिळणार असून या स्पर्धेमुळे भविष्यात भारतालाही गुणवान क्रिकेटपटू मिळणार आहेत. सलग तिसऱ्या वर्षी खेळल्या जाणाऱ्या या स्पर्धेच्या यशात सर्व संघांच्या मालकांचा मोलाचा वाटा आहे. एमपीएल व डब्ल्यूएमपीएल हे केवळ स्पर्धात्मक मंच नसून एक परिवार आहे. संघमालक, खेळाडू, पदाधिकारी, टेक्निकल टीम आणि सपोर्ट स्टाफ यांचे परिश्रम या यशामागे आहेत. रायगड क्रिकेट असोसिएशन श्री अनिरुद्ध पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्यांची सर्व कमिटी रायगड क्रिकेटच्या विकासासाठी उत्तम प्रयत्न करत आहेत, या गोष्टीचा मनस्वी आनंद आहे. आमचा दृढ विश्वास आहे की येत्या काळात एमपीएल व डब्ल्यूएमपीएल च्या माध्यमातून रायगड जिल्ह्यातील अधिकाधिक खेळाडू महाराष्ट्राकडून व पुढे जाऊन देशासाठी खेळतील.

महाराष्ट्र क्रिकेट संघटना आगामी हंगामात राष्ट्रीय क्रिकेट अकादमीच्या धर्तीवर स्वतःची अकादमी सुरु करणार असून, मुख्य अकादमी अजय शिर्के यांच्या नावाने पुण्यातच सुरु करण्यात येईल. त्यानंतर जिल्ह्यात चार विभागीय अकादमी सुरु करण्यात येणार असून, यातील एक रत्नागिरीत दापोली येथे झोनल अकॅडमी सुरू करण्यात येणार आहे.

माजी आमदार अनिकेत तटकरे म्हणाले की ज्याप्रमाणे आयपीएल स्पर्धेमुळे देशातील अनेक ग्रामीण भागातील गुणवान खेळाडूंना आंतरराष्ट्रीय सामन्यांची दारे खुली झाली, त्याप्रमाणेच एमपीएल स्पर्धेमुळे ग्रामीण भागातील खेळाडूंना आपले कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार असून त्यांच्यासाठी भविष्यात अनेक संधी निर्माण होणार आहेत. रायगड रॉयल्स संघ मालक अलिशा बाहेती म्हणाल्या की स्वराज्याची राजधानी असलेल्या रायगड जिल्ह्याला ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे. त्यामुळे या जिल्ह्याचा संघमालक असल्याचा अभिमान वाटतो.

तसेच रायगड व महाराष्ट्रात अनेक होतकरू पुरुष व महिला खेळाडू असून या खेळाडूंना आमच्या फ्रँचायझीच्या माध्यमातून आपली गुणवत्ता सिद्ध करण्याची संधी मिळणार असल्यामुळे एक समाधानाची भावना आहे.

या वर्षीच्या महाराष्ट्र प्रीमियर लीग व वुमन्स महाराष्ट्र प्रीमियर लीग लिलावासाठी ४०९ पुरुष खेळाडू आणि २४९ महिला खेळाडू नोंदणीकृत होते, ज्यामधून संघमालकांनी आपापल्या संघाचा बॅलन्स व गरजांनुसार संघासाठी खेळाडूंची निवड केली. या हंगामात एमपीएल मध्ये ६ संघ आणि डब्लूएमपीएल मध्ये ४ संघ सहभागी झाले असून, ही स्पर्धा येत्या मे व जून २०२५ मध्ये एमसीए गहुंजे इंटरनॅशनल स्टेडियम, पुणे येथे खेळविण्यात येणार आहे.

स्पर्धेच्या सामन्यांचे थेट प्रक्षेपण जिओ हॉटस्टार (Jio Hotstar) व स्टार स्पोर्ट्स २ (Star Sports 2) या वाहिन्यांवर करण्यात येणार आहे, ज्यामुळे ही स्पर्धा राज्यासह संपूर्ण देशभरातील प्रेक्षकांपर्यंत पोहोचणार आहे.

पान १ वरुन

## देशविरोधी पोस्टप्रकरणी पेणच्या युवकाला अटक

मोसिनने त्याच्या सोशल मीडिया अकाऊंटवरुन फिर्यादी आयुष शहाला पोस्ट पाठवली. ‘इंडिया के रुल्स की तहेस नहेस हो गई है, संभलके रहो हमारे पास तो तलवारे, बॉम्ब, मिसाईल सब रेडी है, देख रहा है ना इराण सब लेके बैठा है! जो भी मुस्लिम को तकलीफ देगा एक मिनिट मे उडा देगा वो, एक दिन इंडिया भी हमारा होगा, पुरा कब्जा हमारा होगा, और हम मस्त दबा के मारेंगे’ असे चिथावणीखोर आणि चुकीची माहिती फिर्यादी आयुष शहा यांना देवून त्यांच्या मनामध्ये भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला.

भारत–पाकिस्तान यांच्यात युद्धजन्य परिस्थिती असताना मोसिन मुजावर याने दोन धर्मियांमध्ये तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. मोसिन पेणचा असला तरी मुंबईला राहतो आणि त्याचे वडील अरब देशात नोकरी करतात. मोसिनच्या पोस्टनंतर पेण तालुक्यासह रायगडमध्ये खळबळ उडाली होती. त्यानंतर ९ मे रोजी रात्री पावणे अकराच्या सुमारास त्याच्यावर पेण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर शनिवारी पेणमध्ये सर्वपक्षीय निषेध रॅली काढून मोसिन मुजावरचा निषेध करण्यात आला होता.

## ...तर रामबागच्या कारवाईविरोधात ग्रामस्थ जनआंदोलन करणार

या वेळी न्हावे ग्रामपंचायतीचे माजी सरपंच हरेश्वर म्हात्रे यांनी बोलताना सांगितले की, विमानतळ, इमारती व इतर प्रकल्प बांधण्यासाठी सीआरझेडचे नियम सिडको पायदळी तुडवते. मात्र या ठिकाणी नियमाचा फार्स करून विशेषतः व्यक्तिगत राग काढण्याचा न्यायालयात आणि सिडकोत जाण्याचा प्रयत्न झाला आहे. त्यामुळे रामबागेला सिडकोकडून नोटीस मिळाली. बागेवर कारवाई करण्यासाठी काहींची धडपड सुरू आहे, मात्र रामबाग परिसराचे वैभव आहे आणि त्यावर कुठलीही कारवाई होऊ नये यासाठी आम्ही ग्रामस्थ एकत्र आलो आहोत. रामबाग आहे त्या ठिकाणी कोणत्याही प्रकारचे बांधकाम नाही तर बगीचा आणि शौचालय आहे. लोकांसाठी असलेली हि बाग आहे आणि त्यासाठी येथे कुठलेही तिकीट नाही विनाशुल्क या बागेचा राज्यभरातील पर्यटक आनंद घेत आहेत. या ठिकाणी असलेली विविध प्रकारची झाडे समुद्र किनारा आणि निसर्गाला पूरक आहेत. ही बाग लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी परिसराच्या वैभवासाठी आणि लोकांसाठी बांधली आहे त्यामुळे त्यावर ग्रामस्थांचा अधिकार राहिला आहे, असेही त्यांनी स्पष्ट केले. पुढे बोलताना या बागेचे संरक्षण आणि विकास सिडकोने किंवा ग्रामपंचायतीने करण्याची मागणी आमदार महेश बालदी यांनी ग्रामस्थांच्या मागणीवरून यापूर्वीच सिडकोकडे केली आहे. असेही या वेळी त्यांनी नमूद केले.

या बैठकीला आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत, नेरे मंडल अध्यक्ष भूपेंद्र पाटील, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, न्हावे ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच सागर ठाकूर यांच्यासह पंचक्रोशीतील लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ शेकडोंच्या संख्येने उपस्थित होते.

***कमळासारखी फुलवली रामबाग***

***चिखलाळ भरलेल्या खाडी परिसरात जसे कमळ फुलते, तशीच ही रामबाग फुलवली गेली आहे. स्थानिक नागरिकांसाठी हा परिसर फक्त एक बाग नसून निसर्गाशी जोडणारा प्राणवायू केंद्र आहे, मात्र काही व्यक्तींच्या वैयक्तिक कारणांसाठी या बागेवर सिडकोकडून तोडक कारवाई करण्याचे संकेत मिळत आहेत, जे ग्रामस्थांना कोणत्याही परिस्थितीत मान्य नाहीत.***

## कर्मवीर अण्णांची भूमी आणि छत्रपती शिवाजी कॉलेज माझ्यासाठी पंढरी

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पुढे बोलताना सांगितले की, ज्या वर्गात मी शिकलो त्या वर्गात माझा सत्कार होत आहे, याचा मला अभिमान आहे. कर्मवीर अण्णांनी जात पात धर्म पंथ न मानता बहुजन समाजाला शिक्षित केले. माणुसकीचा धर्म कर्मवीर अण्णांनी शिकवणीतून दिला तसेच शाहू फुले आंबेडकरांची शिकवण अण्णांनी रुजवली, असे त्यांनी अधोरेखित केले. मी कमवा व शिका योजनेत शिकलो त्यामुळे येथील अनेक आठवणी आहेत. छत्रपती शिवाजी कॉलेज माझा जीव कि प्राण आहे. गरिबीत काढलेले दिवस आजही आठवणीत आहेत, जीवनात भरपूर कमावले पण गरजुंना देण्याची सवय माझी कधीही जाणार नाही. माझ्या जे काही आहे ते देण्याचा मी प्रयत्न करतो. कर्मवीर अण्णांची विद्यापीठ करण्याची इच्छा होती आणि ती पूर्ण करण्यासाठी हातभार लावता आला याचा मला आनंद आहे, असेही त्यांनी नमूद केले. त्यांनी पुढे बोलताना, त्या काळचे शिक्षक शिस्तीने कडक पण तेवढेच मनमिळावू असल्याचे सांगत सर्व शिक्षकांप्रती आपली आदरभावना व्यक्त केली तसेच बालपणीच्या आठवणीत कधीही खंड पाडू नका असे आवाहन करत माजी सहकाऱ्यांना भेटून आनंद झाल्याची भावनाही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य राजेंद्र मोरे यांनी केले.

## पनवेल फुटबॉल लीग २०२५

स्थानिक फुटबॉलपटूंना व्यासपीठ मिळाले पाहिजे या दृष्टिकोनातून या पनवेल फुटबॉल लीगचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार ग्रँड ऑक्शनद्वारे संघ रचना झाली असून खारघर किंग, तळोजा टायटन्स, कळंबोली वॉरिअर्स, कामोठे नाईट्स, पनवेल सिटी फुटबॉल क्लब, पनवेल पॅन्थर, न्यू पनवेल युनायटेड, खांदा कॉलनी स्ट्रायकर्स या आठ संघाचा आणि नामवंत खेळाडूंचा सहभाग असणार आहे.

पनवेल फुटबॉल लीग ही स्पर्धा फक्त खेळापुरती मर्यादित नाही तर तरुणांना खेळाकडे वळविणारा एक सामाजिक उपक्रम ठरणार आहे तसेच या माध्यमातून खेळाडूंना पुढील स्तरावर जाण्याचा मार्ग मिळणार आहे.

## बारवई आदिवासीवाडीतील कार्यकर्ते भाजपत

या प्रवेश सोहळ्याला आमदार महेश बालदींसह भाजप कर्नाळा मंडळ अध्यक्ष मंगेश वाकडीकर, गुळसुंदे जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ. अविनाश गाताडे, पोयंजे पंचायत समिती अध्यक्ष प्रवीण ठाकूर, गुळसुंदे पंचायत समिती अध्यक्ष सुनील माळी, वावेघर सरपंच गुरुनाथ गाताडे, बारवई येथील निलेश बाबरे, जे.डी. पाटील, बारवई बुथ अध्यक्ष सुनील दळवी, विजय बाबटे, कसळखंडचे माजी सरपंच अनंत पाटील, प्रवीण खंडागळे, ज्ञानेश्वर सुर्वे, राम गाताडे, वावेघर माजी सरपंच विजय चव्हाण, भाजप महिला मोर्चा गुळसुंदे विभाग अध्यक्ष रेश्मा माळी, प्रतिक भोईर, मंगेश लबडे आदी उपस्थित होते.

## टेम्पोच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू

**नवी मुंबई :** टेम्पोच्या धडकेत पादचाऱ्याचा मृत्यू झाल्याची घटना वाशीत घडली आहे. या प्रकरणी अज्ञात टेम्पो चालकावर गुन्हा दाखल केला आहे. वाशी येथे राहणारे वसंत सरकाळे (७६) हे सेक्टर १७ येथील वाशी–कोपरखैरणे मार्गाने चालत चालले होते. यावेळी भरधाव टेम्पोने त्यांना धडक दिल्याने ते रस्त्यावर पडून जखमी झाले होते. मात्र, टेम्पो चालकाने त्यांच्या मदतीसाठी न थांबता पळ काढला.

दरम्यान, अपघातानंतर वसंत यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले, मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले. या अपघातप्रकरणी त्यांच्या कुटुंबीयांनी वाशी पोलिसांकडे तक्रार केली आहे. त्यानुसार पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, पोलिस अधिक तपास करत आहेत.

## निवडक

### पनवेलमधून स्कूटीची चोरी

**पनवेल :** शहरातील शिवशंभो नाका येथील न्यू पंजाब हॉटेल समोर उभी करून ठेवलेली दुचाकी गाडी अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याची घटना घडली आहे. दिनेश राजानी यांनी त्यांची २० हजार रुपये किंमतीची होंडा अॅक्टीव्हा गाडी ही हॉटेल समोर उभी असताना अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याने याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

### बोलण्यात गुंतवून रक्कम लंपास

**पनवेल :** बोलण्यात गुंतवून दोघा अनोळखी व्यक्तींनी दुकान मालकाला बोलण्यात गुंतवून दुकानातील कॅश काऊंटरमधून रोख रक्कम लंपास केल्याची घटना ओरियन मॉलमध्ये घडली आहे. येथील अमुक्ती शॉपमध्ये दोन अनोळखी व्यक्ती त्यामध्ये एक पुरुष व एक महिला ग्राहक बनून दुकानात आले व त्या पैकी अनोळखी मुलीने दुकानातील कर्मचाऱ्याला बोलण्यात गुंतवून तिच्याबरोबर असलेल्या मुलाने दुकानातील कॅश काऊंटमध्ये ठेवलेली २० हजार रुपये रोख रक्कम लबाडीने चोरून ते पसार झाले आहेत. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे

### सुपर मार्केट शॉपमध्ये चोरी

**पनवेल :** एका अज्ञात चोरट्याने पनवेल तालुक्यातील नेरे सुपर मार्केट शॉपमध्ये चोरी करून आतील ऐवज तसेच रोख रक्कम चोरून नेल्याची घटना घडली आहे. नेरे सुपर मार्केट शॉपचे शटर अज्ञात चोरट्याने कश्याचे तरी सहाय्याने तोडून व आत प्रवेश करून दुकानातील विविध सामान व रोख रक्कम असा मिळून जवळपास ७१ हजार ५०० रुपये किंमतीचा ऐवज चारून नेला आहे. याबाबतची तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने चिंध्रण येथे विकासकामे

## भाजप नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते भूमिपूजन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील चिंध्रण येथे पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या पुढाकाराने सभागृह तसेच शुशोभीकरणासाठी ४० लाख रुपये मंजूर झाला आहे. या कामाचे भूमिपूजन बुद्ध पौर्णिमेच्या औचित्य साधून सोमवारी (दि.१२) ज्येष्ठ नेते अरुणशेठ भगत यांच्या हस्ते करण्यात आले.

सारनाथ मित्रमंडळ चिंध्रण यांच्या विद्यमाने बुद्ध पौर्णिमा आणि संयुक्त जयंती महोत्सवाचा आयोजन आज करण्यात आले होते. या कार्यक्रमाला भारतीय जनता पक्ष नेरे मंडळ अध्यक्ष भूपेंद्र पाटील जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अमित जाधव, एकनाथ देशकर, चिंध्रण गावचे सरपंच एकनाथ पाटील, माजी उपसरपंच अनंता कडू, ग्रामपंचायत सदस्य मनोज कुंभारकर, माजी सदस्य सुरेश मुंबईकर, माजी सरपंच गणपत कडू, तुकाराम पाटील, पनवेल तालुका महिला मोर्चाच्या अध्यक्षा कमला देशेकर, माजी उपसरपंच दिनेश पाडेकर, माजी उपसरपंच शंकर देशेकर, माजी उपसरपंच अभिमन्यू पाटील, रवींद्र पाटील, बाबुशेठ मुंबईकर, रोहिदास पाटील, पांडुरंग पाटील, चंद्रकांत देशेकर, दीपिका सोनावले, माजी उपसरपंच नरेश सोनावले यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.





# प्रखर उन्हाळ्यात सर्वत्र ढगाळ वातावरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सध्यास्थित उन्हाळ्याचे दिवस सुरू आहे, परंतु त्यातच ढगाळ वातावरण निर्माण होत असल्यामुळे मानवी आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

अशा वातावरणामुळे उन्हाळा कमी प्रमाणात जाणवू लागत आहे. मे महिना हा प्रखर उन्हाचा कालावधी असतो, परंतु गेल्या आठवड्यामध्ये अवकाळी पाऊस पडल्याने तालुक्याच्या ठिकाणी ढगाळ वातावरण निर्माण झाले. या ढगाळ वातावरणामुळे हवामानात बदल होत असतांनी सर्वत्र ठीकांनी पहावयास मिळत आहे, परंतु अशा वातावरणामुळे शरीराला थकवा जाणू लागला तसेच या आजारापासून बचाव करण्यासाठी प्रत्येक जण डॉक्टरचा सल्ला घेतानी दिसत आहे.

या वर्षी मे महिन्यात अचानक वातावरणात बदल होवून ढगाळ वातावरण तयार होते आणि या वातावरणामूळे अनेक लहान मोठ्यांच्या प्रकृतीत बिघाड होवून त्यांना रुग्णालयकडे धाव घ्यावी लागत आहे. मागील काही दिवसापासून प्रखर उन्हामुळे प्रत्येक माणसाच्या जीवाची लाहीलाही होत असतांना अचानकपणे वातावरणात बदल होवून ढगाळ वातावरणासह मेघगर्जनेसह तालुक्यात तालुक्यात बऱ्याच ठिकांनी अवकाळी पाउस पडल्याने अनेकांना चिंतने ग्रासले आहे.



# भगवान गौतम बुद्धांना पनवेल महापालिकेतर्फे अभिवादन

## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित स्पर्धांचे बक्षिस वितरण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

वैशाख पौर्णिमा म्हणजेच बुद्धपौर्णिमा निमित्ताने आंबेडकर भवन येथे सोमवारी दि.१२) पनवेल महापालिकेच्या वतीने तथागत गौतम बुद्धांना अभिवादन करण्यात आले तसेच भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेकडून घेण्यात आलेल्या विविध स्पर्धांचे बक्षिस वितरण समारंभ आयोजित करण्यात आला.

या वेळी आमदार आमदार प्रशांत ठाकूर, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त अभिषेक पराडकर, मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ.आनंद गोसावी, माजी महापौर कविता चौतमोल, विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, माजी नगरसेवक अॅड. प्रकाश बिनेदार, डॉ.बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनचे सर्व पदाधिकारी, माजी नगरसेवक तसेच मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ.राजू पाटोदकर, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.भगवान गीते, अधिक्षक किर्ती महाजन, अधिक्षक प्रकाश गायकवाड, सामान्य प्रशासन विभाग प्रमुख अमर पाटील, शिक्षण विभागातील सर्व शिक्षक उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले, जगभर शांततेचा प्रचार व प्रसार करणाऱ्या तथागत गौतम बुद्धांची शिकवण भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी स्विकारुन बौध्द धर्म स्वीकारला,आणि आपल्या सर्वांना जीवनाची दिशा दाखविली. डॉ.आंबेडकरांनी दाखवलेल्या या मार्गावरून जाताना त्यांच्या कार्याची माहिती आजच्या पिढीला समजण्यासाठी महापालिकेच्यावतीने घेण्यात आलेल्या विविध प्रकारच्या स्पर्धा उपयोगी पडणार आहेत.

या वेळी आपल्या प्रास्ताविकात अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे म्हणाले, शांती व करूणा यांचे ज्ञान लाभलेल्या भगवान गौतम बुद्धांनी सर्व सामान्यांना जीवनाचा खरा अर्थ सांगितला. त्यांनी सांगितलेल्या अष्टांग मार्गाचा अवलंब केल्यास आपले जीवन कृतार्थ होते. भगवान बुध्दांनी जे ज्ञान दिले त्याची माहिती विद्यार्थ्यांना व्हावी यासाठी मनपाच्यावतीने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.

या वेळी बोलताना माजी महापौर कविता चौतमोल म्हणाल्या सध्याच्या युध्दाच्या पार्श्वभूमीवर भगवान बुद्धांनी सांगितलेला शांततेचा संदेश महत्त्वाचा आहे. या वेळी माजी नगरसेवक प्रकाश बिनेदार यांनी लोकसहभागातून व महापालिकेच्या माध्यमातून आयुक्त चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४व्या जयंती निमित्त भव्य मिरवणुकीचे आयोजन करण्यात आले व मोठ्या प्रमाणात स्पर्धांचे आयोजन केल्याबद्दल आभार मानले.






***सर्व महिला कलाकार***

*भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या१३४ व्या जयंती निमित्त घेण्यात आलेल्या निबंध लेखन, वक्तृत्व स्पर्धांमध्ये मनपा कार्यक्षेत्रातील व बाहेरील सुमारे दोन हजार ६७२ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. यामध्ये यशस्वी झालेल्या २०० हून अधिक विद्यार्थ्यांना या वेळी बक्षिस वितरण करण्यात आले. तसेच आंबेडकर भवनातील स्पर्धा परीक्षेचा सलग १८ तास अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांना या वेळी सन्मानीत करण्यात आले.*

# मोहोपाडा येथील पल्स मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलचे उद्घाटन

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

रसायनी मोहोपाडा परिसरात अनेक वर्षापासून वैद्यकीय सेवा क्षेत्रात महत्त्वपूर्ण योगदान देणारे डॉ. सागर कांबळे व डॉ. परिणीता वानखडे यांच्या मोहोपाडा येथील पल्स मल्टी स्पेशलिटी हॉस्पिटलच्या नव्याने उभारण्यात आलेल्या वैद्यकीय क्षेत्रात महत्त्वपूर्ण अत्याधुनिक सेवा सुविधा उपलब्ध असलेल्या भव्य दिव्य इमारतीचे उद्घाटन भगवान गौतम बुद्ध जयंतीनिमित्त सोमवारी (दि.१२) करण्यात आले.

सरपंच उमा मुंढे, माजी सरपंच संदीप मुंढे, पतंजली जनरल मॅनेजर संजीव भनोट, वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बांगर, इस्त्रो अधिकारी एस एम भांडारे, डॉ.दीपक कुलकर्णी या प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत आमदार महेश बालदी यांच्या हस्ते झाले.

या वेळी पल्स मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या संपूर्ण व्यवस्थापन टीमने हॉस्पिटलसाठी व्हील चेअर भेट म्हणून दिली. रसायनीकरांसाठी सदैव तत्पर वैद्यकीय सेवा देण्यासाठी अहोरात्र सेवा देणाऱ्या प्लस हॉस्पिटलचे डॉ.सागर कांबळे व परिणिता वानखडे यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. यावेळी पतंजली जनरल मॅनेजर संजीव भनोट यांनी देवीची मूर्ती भेट म्हणून दिली.

या वेळी उपस्थित अनेक मान्यवरांनी भेटवस्तू देऊन डॉ.सागर कांबळे, आर के कांबळे, डॉ.परिणिता कांबळे यांना मोहोपाडा रसायनीत सुसज्ज हॉस्पिटलची इमारत उभारुन वैद्यकीय सेवा उपलब्ध केल्याने आभार मानले.



# पुनाडे धरणाच्या पाणी पातळीत घट

**उरण : प्रतिनिधी**

उरण पूर्व विभागातील दहा गावांना पाणी पुरवठा करणारे पुनाडे धरण महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अखात्यातीत असलेल्या पुनाडे धरणाच्या पाण्याने तळ गाठला आहे. या धरणाची पाण्याची पातळी वाढत्या उष्णतेमुळे कमी होत असून, धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील पाण्याच्या लिकेजमुळे या पाण्यात अधिक घट झालेली दिसत आहे. त्याचप्रमाणे या पूर्व विभागातील दहा गावांना मागील सहा महिन्यांपासून अशुद्ध पाणीपुरवठा होत आहे.

त्यामुळे ग्रामस्थांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत आहे.त्यामुळे येथील ग्रामस्थांना शुद्ध आणि मुबलक पाण्याची आवश्यकता आहे. उरण पूर्व विभागातीलपुनाडे, वशेणी, कडापे, सारडे, भांगरपाडा, पाणदिवे, पिरकोन, पाले, आवरे व गोवठणे या दहा गावांना पुनाडे नळ पाणी पुरवठा योजनेतून पाणी पुरवठा केला जातो. तर धरण परिसरात मुबलक पाऊस होत आहे, मात्र पाणलोट क्षेत्रात असलेल्या लिकेजमुळे पाण्याची पातळी लवकर तळ गाठते.

त्यामुळे चार दिवसांतून एकदा पाणी पुरवठा केला जात असल्याने जनतेला पाणी टंचाईला सामोरे जावे लागत आहे.काही वर्षांपूर्वी या धरणातील पाणी खाली करून गाळ काढण्यात आला होता, मात्र धरणाच्या तळाचा गाळ काढण्याऐवजी धरण परिसरातील किनाऱ्याची माती भरावासाठी काढण्यात आली होती. त्यामुळे धरणाच्या पाण्याच्या पातळीत वाढ आजतागायत झालेलीच नाही. पर्यायी या दहा गावातील ग्रामस्थांना व महिलांना पाण्यासाठी कोप्रोली, चिरनेर खोपटे आदी ठिकाणी पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.



# राज्यशस्त्र दांडपट्टा स्पर्धेत उलव्याच्या ‘वॉरियर्स क्लब’ला उपविजेतेपद

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

महाराष्ट्राचे राज्यशस्त्र दांडपट्टा व लाठीकाठी आदि खेळांना प्रोत्साहित करण्यासाठी ट्रॅडिशनल दांडपट्टा असोसिएशन ऑफ इंडिया आणि भारतीय लाठी महासंघ यांच्या संयुक्त विद्यमाने दापोली येथील सोहनी हायस्कूमध्ये झालेल्या राज्यशस्त्र दांडपट्टा प्रथम राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत येथील वॉरियर्स क्लब ने उपविजेतेपदाचा चषक पटकावला तर लाठी स्पर्धेतही तृतीय क्रमांकाचा चषक जिंकला. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विजेत्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

सोबतच १९ सुवर्ण, सात रजत व सहा कांस्य पदकांसह एकूण ३२ वैयक्तिक पदकांची केली लयलूट. उल्लेखनीय बाब म्हणजे गतवर्षी सोलापूर येथे झालेल्या प्रथम राज्यशस्त्र दांडपट्टा व लाठी अजिंक्यपद स्पर्धेतही वॉरियर्स क्लब ने उपविजेतेपद संपादन केले होते.

१० व ११ मे २०२५ रोजी दापोली येथील सोहनी हायस्कूलच्या सभागृहात झालेल्या या दोन दिवसीय राष्ट्रीय स्पर्धेस नॅशनल दांडपट्टा असोसिएशनचे अध्यक्ष शिवराम भोसले,उपाध्यक्ष सुरेंद्र शिंदे, सचिव अश्विन कडलास्कर,उपाध्यक्षा अंजना कडलास्कर यांच्यासह राष्ट्रीय पंच लहू चव्हाण,कविता शिंदे,दिनेश राठोड,तृप्ती गवारे, देवी चव्हाण, वॉरियर्स क्लबचे प्रशिक्षक ओमकार रंधवे व ऋतुजा रंधवे, अध्यक्ष सागरकुमार रंधवे, वॉरियर्स क्लबच्या जनरल बॉडी सदस्या वैशाली रंधवे, पालक प्रतिनिधी गुंजन मिश्रा, मेहा कोहली मिश्रा, दिक्षा गावडे, चंदाराणी भोईटे, संदिप गाडे, आशा गाडे, आशीष बाळ आदी उपस्थित होते.

वॉरियर्स क्लबच्या स्पर्धकांनी तब्बल ३२ वैयक्तिक पदकांची लयलुट केली. त्यामध्ये सर्वाधिक पाच पदके जिंकणारा लाठीकाठी मधील विश्वविक्रमवीर बाल योद्धा नक्ष गावडे याने दोन सुवर्ण, दोन रजत आणि एक कांस्यपदक जिंकून सर्वाधिक पाच पदके जिंकली तर सर्वाधिक सुवर्णपदके जिंकणाऱ्या ठरल्या लाठी काठीच्या विश्वविक्रमवीर व वॉरियर्स क्लबच्या प्रशिक्षिका ऋतुजा रंधवे व प्रशिक्षणार्थी माऊली परमार, ऋतुजा रंधवे व माऊली परमार या दोघी गुरु शिष्यांनी प्रत्येकी चार सुवर्णपदके जिंकली. तसेच केशवी भुवा व दिशा गाडे या दोघींनीही प्रत्येकी दोन सुवर्णपदके जिंकली, दुर्वा भुवा, मनस्वी भोईटे व मंथन भोईटे यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रजत, ईशी शर्मा एक सुवर्ण व दोन कांस्य, दक्ष कोहली मिश्रा याने एक सुवर्ण व एक कांस्य, अद्रिका बाविस्कर दोन रजत तर काश्वी कुलकर्णी हिने दोन कांस्य पदकांची कमाई केली.

प्रथम राष्ट्रीय राज्यशस्त्र दांडपट्टा व लाठी स्पर्धेतील सर्व विजेत्या स्पर्धकांचे तसेच अजिंक्यपद स्पर्धेतील उपविजेता ठरलेल्या वॉरियर्स क्लबचे प्रशिक्षक ओमकार रंधवे व ऋतुजा रंधवे,ह्यअध्यक्ष सागरकुमार रंधवे यांच्यासह सर्व विजयी स्पर्धकांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य व थोर देणगीदर लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य व जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे उपाध्यक्ष वाय. टी. देशमुख, अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, विजय घरत, जयवंत देशमुख, विधिज्ञा योगिता भगत, अमरशेठ म्हात्रे, अवधेश मेहतो आदिंनी अभिनंदन केले.





# संपादकीय

## ‘सिंदूर’चा तडाखा

पहलगाममधील दहशतवादी हल्ल्याचा तसेच पाकिस्तानच्या यापूर्वीच्या साऱ्याच दहशतवादी कारवायांचा बदला घेण्यासाठी भारताने राबवलेल्या ‘ऑपरेशन सिंदूर’चा किती जबरदस्त तडाखा पाकिस्तानला बसला आहे हे हळूहळू उजेडात येते आहे. यात दहशतवादी तळ उद्ध्वस्त होण्याबरोबरच, किमान १०० दहशतवादी आणि पाकिस्तानचे चाळीस सैनिक मारले गेल्याचे भारताच्या लष्करी दलांकडून सांगण्यात आले आहे. यामुळे पाकला जबर तडाखा बसलाच आहे, पण भारताच्या तिन्ही लष्करी दलांच्या समन्वित कारवाईने अवघा आंतरराष्ट्रीय समुदाय अचंबित झाला आहे.

**‘ऑपरेशन सिंदूर’मध्ये लष्कर, हवाई दल आणि नौदल या तिन्हींच्या सुयोग्य समन्वयातून अचूक आणि जलदगतीने मोहिमा फत्ते करण्यात आल्या. भारताने नेमके लक्ष्य समोर ठेवून आणि तणाव वाढणार नाही याची दक्षता घेत दर्शवलेली संयमी वृत्ती जगाने पाहिली. भारतीय सशस्त्र दलांची ताकद रावळपिंडी येथील पाकिस्तानी लष्कराच्या मुख्यालयालाही जाणवली आहे. पहलगाम दहशतवादी हल्ल्यानंतर पाकिस्तानविरोधात अनेक ठोस निर्णय घेत पाठोपाठ भारताने ‘ऑपरेशन सिंदूर’ राबवले. चार दिवसांच्या अत्यंत सक्षम अशा कारवाईनंतर १० मे रोजी सायंकाळी भारताने शस्त्रसंधीला संमती दिली असली तरी त्याचा अर्थ भारताने माघार घेतली असा अजिबातच होत नाही. भारताने तत्पूर्वी आपली लष्करी ताकद पाकिस्तानला आणि जागतिक समुदायालाही पुरेपूर दाखवून दिली हे मान्य करावेच लागेल. या कारवाईमुळे पाकिस्तानला स्पष्ट संदेश मिळाला आहेच. खेरीज यापुढे पाकिस्तानकडून किंवा तेथे प्रशिक्षिण दिल्या गेलेल्या दहशतवाद्यांकडून भारतात कोणत्याही स्वरुपाचा दहशतवादी हल्ला घडवला गेल्यास त्यास भारतीय भूमीवरील हल्ला मानले जाईल हेही भारताने शस्त्रसंधीनंतर पाकिस्तानला ठणकावून सांगितले आहे. अर्थात या अत्यंत महत्त्वपूर्ण अशा इशाऱ्याची चर्चा होण्याऐवजी दोन्ही देशांच्या आधी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी शस्त्रसंधीची घोषणा केल्याबद्दलच आपल्याकडे उलटसुलट चर्चेला उधाण आले. त्यातच शस्त्रसंधीला संमती दर्शवल्यानंतर लगेचच पाकिस्तानकडून पुन्हा सीमेवर ड्रोन डागण्यात आल्याने देशातील जनतेतही काही काळ गोंधळाचे वातावरणही निर्माण झाले. शस्त्रविरामाचे श्रेय अमेरिकेने घेतले असले तरी भारताने मात्र शस्त्रविराम हा दोन्ही देशांतील चर्चेतून झाल्याचे नंतर स्पष्ट केले. काश्मीर प्रश्नी भारत कधीही तिसऱ्या देशाची मध्यस्थी स्वीकारणार नाही आणि पाकिस्तानने बेकायदा ताब्यात घेतलेला प्रदेश परत करणे हीच द्विपक्षीय चर्चेची दारे पुन्हा खुली करण्याची एकमेव पूर्वअट असेल असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी रविवारी स्पष्ट केले. तरीही ट्रम्प यांच्या शस्त्रसंधीच्या घोषणेवरून मोदी सरकारला कोंडीत पकडण्याचे प्रयत्न विरोधकांनी लागलीच सुरू केले. त्यामुळे ‘ऑपरेशन सिंदूर’ सुरू झाल्यापासून विरोधकांनी पांघरलेले संयमाचे आणि राष्ट्रहिताचे ढोंग गळून पडले. यादरम्यान आंतरराष्ट्रीय नाणेनिधीने भारताच्या विरोधानंतरही पाकिस्तानला आर्थिक मदत मंजूर केली हे खटकणारे आहेच. परंतु तसे असले तरी जगभरासमोर भारताने आपली बाजू भक्कमपणे मांडली आहे. भारताने लवकरच संयुक्त राष्ट्रात विशेष दूत पाठवून पाकिस्तानच्या कुरापतींचे ठोस पुरावे जगासमोर ठेवले पाहिजेत. ब्रह्मोस क्षेपणास्त्रे आणि भारतीय बनावटीचे ड्रोन यांच्या अचुकतेचे तसेच आपल्या संयम, शौर्य आणि दूरदृष्टीचे दर्शन अवघ्या जगाला घडवल्यानंतर आता हळूहळू देशातील परिस्थिती पूर्वपदावर येते आहे. सोमवारी देशातील विमानसेवादेखील पुन्हा सुरळीत सुरू झाली. अर्थात पाकिस्तान हा देश विश्वास ठेवण्याच्या लायकीचा नसल्याने आपल्या लष्करी दलांना आणखी काही काळ अधिकची सर्तकता बाळगावीच लागणार आहे.**

# कोळशाची ओव्हरलोड वाहतूक कोणाच्या आशीर्वादाने?



**खबरबात**
**महेश शिंदे**

औद्योगिक क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात लागणारा दगडी कोळसा अवजड वाहनांमधून ओव्हरलोड वाहतूक करत कंपन्यांना पुरवठा केला जात आहे. ज्या वाहनातून हा कोळसा आणला जातो त्या वाहनांच्या मूळ आकारात बदल करून वाहतूक केली जात असली तरी रस्त्यावर उभ्या असलेल्या परिवहन आणि पोलिस प्रशासनाला ही धोकादायक वाहतूक दिसत का नाही असा प्रश्न उपस्थित होत आहे. या वाहनांमुळे यापूर्वी अनेक अपघात होऊन देखील कारवाई होत नसल्याने या ओव्हरलोड वाहतुकीला पाठबळ कोणाचे असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

कोकणात महाड, खेड, चिपळूण, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या ठिकाणी औद्योगिक क्षेत्र अस्तित्वात आहे. कोकणातील या औद्योगिक क्षेत्रामध्ये बॉयलर साठी मोठ्या प्रमाणात दगडी कोळसा लागतो. हा दगडी कोळसा बाहेरून मालगाडीने नागोठणे येथे येतो. त्यानंतर अवजड वाहनांमधून हा दगडी कोळसा महाड, खेड, चिपळूण या ठिकाणी पुरवठा केला जातो. या दगडी कोळशाच्या पुरवठ्यामध्ये बड्या लोकांचा हात असल्याने प्रमाणापेक्षा जास्त दगडी कोळसा वाहनांमध्ये भरून मुंबई गोवा महामार्गावर वाहतूक केला जातो. मुंबई गोवा महामार्गावर पळस्पे, नागोठणे, महाड, पुढे कशेडी या ठिकाणी महामार्ग वाहतूक पोलिसांचे तपासणी नाके आहेत. या ठिकाणी अन्य वाहनांची तसेच छोट्या कार, प्रवासी वाहतूक करणाऱ्या मोजक्याच बसेस, मोटर सायकल स्वार यांना थांबवून तपासणी केली जाते. यामध्ये प्रवाशांची तसेच वाहन चालकांची वेळ आणि पैसा देखील वाया जातो. यादरम्यान कोळसा वाहतूक करणाऱ्या वाहनांना मात्र रेड कार्पेट टाकला जातो. या अवजड वाहनांना का सूट दिली जाते असा प्रश्न वाहनचालक विचारत आहेत. कोळसा वाहतूक करणाऱ्या या वाहनांना यापूर्वी देखील अपघात झाले आहे. या अपघातामध्ये अनेक जण मयत देखील झाले. मात्र तरीदेखील पोलीस आणि परिवहन (आर.टी.ओ.) विभागाकडून कोणतीच कारवाई केली जात नाही. वाहनाची मालवाहतूक करण्याची क्षमता निर्धारित केलेली असताना त्याच्यावर बदल करून अधिक माल वाहून नेण्याचे काम हायवा मालकांकडून केले जात आहे. या अधिकतम मालामध्ये देखील मोठी कमाई या कोळसा वाहतूकदारांकडून आणि पुरवठा दराकडून केली जाते. मात्र महामार्गावर होणाऱ्या अपघातांबाबत या वाहतूक ठेकेदार कोळसा पुरवठा आणि प्रशासनाला काहीही सोयर सुतक नसल्याचे दिसून येत आहे. याबाबतीत शासनाने कठोर कारवाई करावी अशी मागणी देखील करण्यात येत आहे.

# बुद्धिमत्ता, शिस्त, कौशल्ये यांना परिश्रमाची जोड



एखाद्याच्या यशामध्ये अनेक घटक महत्त्वाची भूमिका बजावतात. बुद्धिमत्ता, शिस्त, कौशल्ये आणि परिश्रम हे यामधील चार अत्यंत महत्त्वाचे स्तंभ आहेत. यापैकी केवळ एकाचा आधार घेऊन यश प्राप्त करता येते का? उत्तर आहे – नाही. कोणतीही गोष्ट केवळ बुद्धिमत्तेने शक्य होत नाही, तर शिस्त आणि योग्य कौशल्याची जोड लागते. पण याहीपेक्षा महत्त्वाची गोष्ट म्हणजे परिश्रम. कारण ही सगळी शक्ती, ज्ञान आणि क्षमतांची फळे फळवण्यासाठी आवश्यक असते ती म्हणजे सातत्याने केलेले प्रामाणिक परिश्रम.

आपल्या आयुष्यात यश मिळवण्यासाठी आपण अनेक गोष्टींचा विचार करतो – काही जाणीवपूर्वक, तर काही नकळत. पण यशाचा पाया असतो वैयक्तिक गुणांचा संतुलित संगम. बुद्धिमत्ता, शिस्त आणि कौशल्ये ही त्रिकूट म्हणजे यशाची पूर्वतयारी आहे. पण या त्रिकूटाला जर योग्य ती ऊर्जा आणि दिशा द्यायची असेल, तर त्या मागे लागतो एकमेव घटक – परिश्रम.

यश हे एक विशाल पर्वत आहे, ज्यावर चढण्यासाठी आपल्याला विविध साधनांची आवश्यकता असते – बुद्धिमत्ता, शिस्त, कौशल्ये आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे परिश्रम. आयुष्यात कोणत्याही क्षेत्रात यश मिळवण्यासाठी हे सर्व गुण एकत्र असणे आवश्यक आहे. यापैकी केवळ एक जरी कमी पडले, तरी यशाच्या शिखरावर पोहोचणे कठीण होते.

यशस्वी जीवनाचे चतु:सूत्र: बुद्धिमत्ता, शिस्त, कौशल्ये आणि परिश्रम. यशस्वी जीवनाची इमारत चार मजबूत स्तंभांवर उभी असते, ती म्हणजे बुद्धिमत्ता, शिस्त, कौशल्ये आणि परिश्रम. या चार घटकांचा योग्य मेळ साधला तर जीवनात यश मिळवणे नक्कीच शक्य होते.

बुद्धिमत्ता ही निसर्गाने दिलेली एक अद्भुत देणगी आहे. ती माणसाला विचार करण्याची, निर्णय घेण्याची, विश्लेषण करण्याची क्षमता प्रदान करते. बुद्धिमान व्यक्ती कोणतीही गोष्ट लवकर समजू शकते, वेगळ्या दृष्टीकोनातून पाहू शकते, आणि त्यावर उपाय शोधू शकते.

पण केवळ बुद्धिमत्ता असून उपयोग नाही. अनेक वेळा बुद्धिमान व्यक्ती मेहनत कमी करतात आणि त्यामुळे त्यांच्या क्षमता तितक्या प्रगल्भ होत नाहीत. समजा बुद्धिमत्ता ही तुमच्या यश–सफरीचा नकाशा आहे. बुद्धिमत्ता आपल्याला योग्य आणि अयोग्य यामधील फरक शिकवते. कोणती दिशा योग्य आहे, कोणते पर्याय असू शकतात, हे दाखवण्याचे काम ती करते. पण जर केवळ नकाशा हातात घेतला आणि आपण घरातच बसून राहिलो, तर काय उपयोग? याच कारणामुळे बुद्धिमत्तेला पुढे नेणारी शक्ती लागते – ती म्हणजे परिश्रम. नकाशा मार्ग दाखवतो, पण त्यावरून चालायला लागतो. बुद्धिमत्ता हा यशाचा पाया आहे. बुद्धिमत्ता म्हणजे विचार करण्याची क्षमता, समस्या सोडवण्याची क्षमता आणि नवीन गोष्टी शिकण्याची क्षमता. बुद्धिमत्ता ही जन्मत:च मिळत असली, तरी ती योग्य प्रशिक्षणाने आणि प्रयत्नांनी वाढवता येते. बुद्धिमत्ता वाढवण्यासाठी सतत नवीन गोष्टी शिकणे, विचार करणे, समस्या सोडवणे आणि सर्जनशील असणे आवश्यक आहे.

**–डॉ. सुनील पाटील,**
**जयसिंगपूर, कोल्हापूर**



## बदलते तंत्रज्ञान

### बजाज चेतकचे स्वस्त व्हेरिएंट ३५०३ लाँच



दुचाकी उत्पादक बजाज ऑटोने इलेक्ट्रिक स्कूटर चेतक ३५ मालिकेचा सर्वात स्वस्त प्रकार, ३५०३ लाँच केला. त्याची एक्स–शोरूम किंमत १.१० लाख रुपये ठेवण्यात आली आहे.अपडेटेड बजाज चेतकमध्ये नवीन चेसिस फ्रेम वापरली आहे, ज्यामध्ये बॅटरी पॅक फ्लोअरबोर्डखाली ठेवला आहे. यामुळे, ई–स्कूटरमध्येआता सीटखाली ३५ लिटर जागा असेल.

यात ३.५ किलोवॅट क्षमतेचा मोठा बॅटरी पॅक आहे. कंपनीचा दावा आहे की नवीन इलेक्ट्रिक स्कूटर पूर्ण चार्ज केल्यावर १५३ किमीची रेंज देईल. तथापि, कंपनी नवीन चेतकसोबत ३ वर्षे/५०,००० किमी वॉरंटी देत आहे. चेतक ३५ मालिका विडा व्ही२, एथर रिझ्टा, ओला एस१ प्रो आणि टीव्हीएस आयक्यूब सारख्या इलेक्ट्रिक स्कूटरशी स्पर्धा करेल.

बजाजने आपली डीलरशिप ५०७ शहरांमध्ये वाढवली आहे आणि ही स्कूटर ई–कॉमर्स प्लॅटफॉर्म -Amazon आणि Flipkart वर देखील खरेदी करता येईल. अधिकृत वेबसाइटवर त्याचे बुकिंग सुरू झाले आहे.

नवीन चेतक इलेक्ट्रिक स्कूटर ३५ सीरीजची निर्मिती पुण्यातील आकुर्डी येथील बजाज प्लांटमध्ये केली जात आहे, नवीन चेतक इलेक्ट्रिक स्कूटर ३५ सीरीजची निर्मिती पुण्यातील आकुर्डी येथील बजाज प्लांटमध्ये केली जात आहे, जिथे चेतक स्कूटरचे उत्पादन पहिल्यांदा १९७२ मध्ये सुरू झाले होते.

चेतक ३५ मालिकेत कामगिरीसाठी इलेक्ट्रिक मोटर देण्यात आली आहे. कंपनीने अद्याप त्याच्या नेमक्या शक्तीबद्दल माहिती दिलेली नाही. कंपनीचा दावा आहे की ई–स्कूटरचे ३५०१ आणि ३५०२ मॉडेल्स ७३ किमी प्रतितास इतका वेग गाठू शकतात. त्याच वेळी, ३५०३ चा टॉप स्पीड ६३ किमी प्रतितास असेल. इलेक्ट्रिक मोटरला पॉवर देण्यासाठी, एक नवीन ३.५kWh बॅटरी पॅक देण्यात आला आहे, जो चेतकमधील आतापर्यंतची सर्वात मोठी बॅटरी आहे. कंपनीचा दावा आहे की स्कूटरला एकदा पूर्ण चार्ज केल्यावर IDC प्रमाणित १५३ किमी रेंज आणि रिअल रेंज १२०–१२५ किमी मिळेल.

आरामदायी बसण्यासाठी ८० मिमी लांब सीट उपलब्ध असेल.चेतक स्कूटर जुन्या मॉडेलसारखीच दिसू शकते, परंतु त्यात अनेक तांत्रिक बदल करण्यात आले आहेत.

# कवी, गीतकार संदीप खरे



**निमित्त**

संदीप खरे कवी, गीतकार युवा पिढीतील लोकप्रिय गीतकार–कवी म्हणून संदीप खरे सर्वपरिचित आहेत. आपल्या रचनांवर तरुण पिढीला हजारोंच्या संख्येने झुलवण्याचे सामर्थ्य संदीप यांच्या गीतांना व कवितांना लाभले .सोपी पण अर्थवाही, तसेच आजच्या पिढीच्या थेट परिचयाची भाषा आणि अभिव्यक्ती हे संदीप खरे यांच्या गीतांचे वैशिष्ट्य आहे.

संदीप खरे यांचा जन्म१३ मे १९७३ रोजी पुण्यात झाला. संदीपने इयत्ता चौथीत असताना संदीप खरे यांनी पहिली कविता केली. अनेक शालेय स्पर्धांमध्ये त्याने कविता आणि कथा या विषयात अनेक पारितोषिके मिळवली आहेत. महाराष्ट्र साहित्य परिषदेने आयोजलेल्या ’उमलते अंकुर’ या कार्यक्रमात त्यांनी सादर केलेल्या कविता ही कवी म्हणून त्यांची ओळख निर्माण होण्याच्या दृष्टीने महत्त्वाची घटना ठरली

अभियांत्रिकी पदविकाधारक असलेले संदीप खरे जाहिरातक्षेत्रात अनेक सन्मान पटकवणारा आघाडीचा कॉपीरायटर, जिंगल, टीव्ही रेडिओ अ‍ॅड क्षेत्रात कार्यरत. होते महाविद्यालयीन दिवसांपासूनच आपल्या वेगळ्या कवितांनी लक्ष वेधून घेतले. ‘चकवा’ या चित्रपटातून संदीप यांनी चित्रपट क्षेत्रात गीतकार म्हणून पदार्पण केले. ‘आनंदीआनंद’, ‘निशाणी डावा अंगठा’, ‘हाय काय नाय काय’, ‘जमीन’, ‘हापूस’, ‘तुला शिकवीन चांगलाच धडा’, ‘कालचक्र’, ‘जावईबापू झिंदाबाद’, ‘जनगणमन’, ‘मोरया’, ‘बदाम राणी गुलाम चोर’ असे २५ चित्रपट संदीप खरे यांच्या गीतांनी सजले आहेत. संगीतकार सलील कुलकर्णी यांच्यासोबत त्याची जोडी सर्वाधिक यशस्वी ठरली आहे.

त्यांचे ’दिवस असे की’ आणि ’आयुष्यावर बोलू काही’ हे गीतसंग्रह विशेष प्रसिद्ध आहेत. सलील कुलकर्णींबरोबर त्यांनी बरेच गीतसंग्रह प्रकाशित केले आहेत. त्यांच्या व्यासपीठावरील आयुष्यावर बोलू काही या कार्यक्रमांमुळे ते सुरुवातीला प्रसिद्धी झोतात आले. त्या कार्यक्रमाचे हजाराच्यावर प्रयोग झाले आहेत. आयुष्यावर बोलू काही बरोबरच, ते कवी वैभव जोशी ह्यांच्यासोबत ’इर्शाद’ हा कवितांचा कार्यक्र देखील करतात. आजही त्यांचे कार्यक्रम हाऊसफुल असतात. संदीप यांनी ’दमलेल्या बाबाची कहाणी’ या मराठी चित्रपटात प्रमूख भूमिका केली आहे.

तसेच त्यांनी ‘ताक धिना धिन’, ‘वहिनीसाहेब’, ‘बिनधास्त’, ‘अशी ही माहेरची साडी’, ‘झेप’, ‘जिवलगा’ या मालिकांसाठी गीतलेखन केले आहे. कवी म्हणून संदीप खरे यांचे ‘कॅलिडोस्कोप’, ‘कधीतरी वेड्यागत’, ‘आयुष्यावर बोलू काही’, ‘अग्गोबाई ढग्गोबाई’, ‘कधी हे कधी ते’, ‘नामंजूर’, ‘दमलेल्या बाबाची कहाणी’, ‘सांग सख्या रे’, ‘संधिप्रकाश’, ‘हृदयामधले गाणे’ रंगमंचीय कार्यक्रमही लोकप्रिय आहेत. त्यांचे ‘मौनाची भाषांतरे’, ‘नेणिवेची अक्षरे’ आणि ‘तुझ्यावरच्या कविता’ हे कवितासंग्रह आहेत. झी टी.व्ही. गौरव पुरस्काराचे ते मानकरी ठरले आहेत. ‘बायोस्कोप’ या चित्रपटामधील ‘मित्रा’ कथेत एक महत्त्वाची भूमिका साकारीत संदीप खरे यांनी अभिनय क्षेत्रामध्ये पदार्पण केले. ‘दमलेल्या बाबांची कहाणी’ या मराठी चित्रपटात त्यांनी प्रमूख भूमिका केली आहे.

**बातमीतील बात**






## आरोग्य प्रहर

### यकृताच्या आरोग्यासाठी ‘हा’ पदार्थ ठरतोय घातक

यकृताच्या आरोग्याची विशेष काळजी घेणं खूप गरजेचं असतं, अन्यथा त्याचा संपूर्ण शरीरावर परिणाम होतो.

सूर्यफूल, करडई, कापूस यांच्या बियांपासून तयार होणाऱ्या तेलांमध्ये लिनोलिक ॲसिड म्हणून ओळखल्या जाणाऱ्या ओमेगा–६ फॅटी ॲसिडचे प्रमाण जास्त असते, जे शरीरास आवश्यक असते.



परंतु, जास्त प्रमाणात सेवन केल्यास शरीरात जळजळ वाढू शकते. त्यामुळे शरीरात आणि आतड्यांमध्ये जळजळ कमी करण्यासाठी ओमेगा ३ आणि ६ चे योग्य प्रमाण राखणे तितकेच महत्त्वाचे आहे. एडविना राज यांच्या मते, बियांपासून तयार होणाऱ्या तेलाचा वारंवार वापर केल्यास शरीरात जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण वाढू शकतो, ज्यामुळे कालांतराने यकृताचे नुकसान होण्याची शक्यता असते.

डॉ. सिमना एल यांनीही यावर सहमती दर्शवत सांगितले की, बियांपासून तयार होणाऱ्या तेलांचे जास्त प्रमाणात सेवन केल्याने यकृतामध्ये जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण येऊ शकतो, ज्यामुळे यकृताचे नुकसान होत आजारी पडण्याची शक्यता असते. सर्व बियांचे तेल समान नसते. जवसाचे तेल आणि चिया बियाण्याचे तेल ओमेगा–३ फॅटी ॲसिडने समृद्ध असते, ज्यामध्ये दाहक–विरोधी गुणधर्म असतात आणि ते यकृताच्या आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकतात.

बियांचे तेल, प्रक्रिया केलेले अन्नाचे जास्त प्रमाणात सेवन, रिफाइंड धान्ये, गोड पदार्थ तसेच अल्कोहोलयुक्त पेये यकृताच्या आरोग्यासाठी निश्चितच हानीकारक असतात, ज्यामुळे इन्सुलिन रेजिस्टेंस आणि यकृतामध्ये चरबी जमा होण्याचा धोका वाढतो; अशाने यकृताशी संबंधित समस्या वाढत जातात. तळलेले आणि बेक्ड केलेल्या पदार्थांमध्ये आढळणारे ट्रान्स फॅट्स यकृतामध्ये जळजळीचे कारण ठरतात, यामुळे यकृताच्या आरोग्याचे नुकसान होते, यकृताच्या आरोग्याबद्दल काळजी घेण्याची गरज असलेल्या लोकांनी उच्च–गुणवत्तेचे, कमीत कमी प्रक्रिया केलेले बियाणे तेल निवडणे हा एक चांगला पर्याय असू शकतो. यकृताचे आरोग्य सुधारण्यासाठी एडविना राज यांनी तेल वारंवार गरम करून वापरू नका असा इशारा दिला आहे. तसेच तुम्ही एकाच प्रकारच्या तेलाऐवजी स्वयंपाक बनवताना राईस ब्रॅन ऑइल, ऑलिव्ह ऑइल, खोबरेल तेल आणि तूप यांसारख्या तेलांचे मिश्रण कमी प्रमाणात वापरू शकता.

# मंतरलेले ताबीज बांधून विहीरीत विटा टाकल्या; तिघांवर गुन्हा दाखल

**रेवदंडा : प्रतिनिधी**

मुरूड तालुक्यातील ताडगाव गावाचे सार्वजनिक विहीरीवर काहीतरी टाकल्याचा संशयावरून एकास ग्रामस्थांनी हटकले, याबाबत पोलिसांना पाचारण करून सदर व्यक्तीस ताब्यात दिले. परंतू साळाव ते ताडगाव पर्यंत विहीरीत विष टाकले, अशा संशयकल्लोळाने पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी रेवदंडा पोलिस ठाणेकडे धाव घेतली. पोलिसांनी योग्य तपास करून अंधश्रध्दा व जादूटोण्याच्या माध्यमातून मंतरलेले ताबीज बांधलेल्या विटा साळाव ते ताडगाव मधील सार्वजनिक विहीरीत टाकून सर्वसामान्य जनतेच्या मनात घबराहट व दहशत निर्माण केल्या प्रकरणी तिघांवर गुन्हा दाखल केला आहे.

मौजे ताडगाव गावाचे सार्वजनिक विहीरीवर रविवार दि. ११ मे २०२५ रोजी सकाळी अकराचे सुमारास, एक व्यक्ती विहीरीत काहीतरी टाकत असल्याचे ग्रास्स्थ हरिश्चंद्र पाटील यांचे निदर्शनास येताच त्यांनी तेथेच माजी मुरूड पं.स. उपसभापती चद्रकांत मोहिते यांना माहिती दिली. त्या व्यक्तीस हरिश्चंद्र पाटील व चंद्रकांत मोहिते यांनी हटकले, व विचारणा केली, त्यावेळी सदर व्यक्तीने विहीरीत काहीतरी टाकल्याचे




निदर्शनास आले.यावेळी मोठया संख्येने ग्रामस्थ घटनास्थळी दाखल झाले.

सध्या पाकिस्तान विरोधात सुरू असलेल्या युध्दजन्य परिस्थितीने ग्रामस्थांच्या मनात विहीरीत विष टाकल्याची शंका निर्माण झाली. त्यामुळे रेवदंडा पोलिसांना ही बाब कळविण्यात आली. रेवदंडा पोलिसांनी सदर व्यक्ती त्याच्या सोबत रिक्षामध्ये असलेल्या महिलेसह रेवदंडा पोलिस ठाण्यात आणले. यावेळी साळाव ते ताडगाव पर्यंत विहीरीत विष टाकले असा संशय पंचक्रोशीत पसरल्याने परिसरातील ग्रामस्थांनी रेवदंडा पोलिस ठाण्याकडे धाव घेतली, यावेळी रेवदंडा पोलिस ठाणे येथे मोठी गर्दी निर्माण झाली

या गर्दीत पंचक्रोशीतील ग्रामस्थ,युवावर्ग तसेच प्रतिष्ठीत मंडळीचा समावेश होता. यावेळी माजी पं.स.समिती उपसभापती चंद्रकांत मोहिते, कोर्लई सरपंच राजश्री मिसाळ, वळके ग्रा.प. माजी सरपंच किशोर काजारे, मोहन ठाकूर, सि.एम. ठाकूर, हरिश्चंद्र पाटील, आदीने पोलिसाना सार्वजनिक विहीरीचे पाणी तपासणी करण्याची विनंती केल्याने पोलिसानी आरोग्य अधिकार्यांस पाचारण करून सार्वजनिक विहीरीचे पाणी तपासणी करण्यात आले . यावेळी भाजपचे जिल्हा सरचिटणीस अँड महेश मोहिते यांनी सुध्दा रेवदंडा पोलिस ठाण्यात भेट घेवून ग्रामस्थांशी वार्तालाप केला. दरम्यान कोणताही अनुचीत प्रकार घडू नये म्हणून रेवदंडा पोलिसांनी जादा पोलिस कुमक तसेच आरएसपी जवानाना पाचारण करून कडक बदोबस्त रेवदंडा पोलिस ठाणे येथे केला होता.

यावेळी रेवदंडा पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपीची चौकशी केली असता, सदर व्यक्तीचे नाव अखलास खान वय ४७ वर्षे, व महिलेचे नाव सेमा खान वय वर्षे ४७ असून ते दोघेही पतीपत्नी असून नवी मुंबई नेरूळ येथील रहिवाशी आहेत. त्यांनी मुंलीने तिच्या प्रियकराचा नाद सोडावा म्हणून जादुटोणा करणारा मांत्रिक मौलाना खलिय राहणार गोंविदनगर कल्याण वेस्ट, यांचेशी आपसात संगनमत करून त्याचेकडून जादुटोणा करून मंतरलेल्या ताबीज बांधून घेतलेल्या पाच विटा त्यांनी नेरूळ येथून रेवदंडा येथे सोबत आणून साळाव ब्रिज ते ताडवाडी या मुरूड तालुक्यातील दरम्यानच्या गावातील रस्ता लगत असलेल्या सार्वजनिक विहीरीत सदरच्या जादुटोणा करून मंतरलेल्या, ताबीज बांधलेली प्रत्येकी एक विट, विहीरीच्या पाण्यात टाकून तसेच येथील जनतेच्या आरोग्यास अपाय व्हावा,या करीता विभूती सदृश्य आणखी काहीतरी दुष्झीत वस्तू पाण्यात टाकून विहीरीचे पाणी दुषीत करून सर्वसामान्य जनतेच्या मनात दहशत व घबराहट निर्माण होईल असे अघोरी कृत्य केले म्हणून रेवदंडा पोलिसांम चंद्रकांत मोहिते यांनी तक्रार दाखल केली आहे.

याबाबत रेवदंडा पोलिस ठाणे नेरूळ नवी मुंबई येथील अखलास खान, सेमा खान तसेच कल्याण गोविंदनगर येथील मौलवी खलिय या तिघांवर रेवदंडा पोलिस ठाणे येथे भा.न्या.स. कलम २७९, ३(५),महाराष्ट्र अंधश्रध्दा व जादुटोणा अधिनियम २०१३ चे कलम ३(१)(२), प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. या कामी विशेष तपास अधिकारी म्हणून पेण पोलिस उपविभागीय अधिकारी गजानन टोम्पे, तसेच मुरूड पोलिस ठाणे पो नि नामदेव बंडगर यांनी भेट दिली. तर रेवदंडा पोलिस ठाणे इन्चार्ज सपोनि. श्रीकांत किरविले हे तपास अधिकारी म्हणून काम पहात आहेत.

# आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्याविरोधात देशद्रोहाचा गुन्हा दाखल करण्याची मागणी

**पाली : प्रतिनिधी**

मागील काही दिवसांपासून भारत पाकिस्तान या दोन देशात तणावाची स्थिती निर्माण झाली आहे.अशातच युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाली असताना पेणमध्ये भारत देशाविरोधात मोसिम मुजावर याने देशवासीयांच्या भावना दुखावतील अशी पोस्ट केली. आणि सर्वत्र संतापाची लाट उसळली. भारत देशाविरोधात आक्षेपार्ह पोस्ट करणाऱ्या विरोधात तात्काळ गुन्हा दाखल करा, अशी जोरदार मागणी रिपब्लिकन सेनेच्या रायगड जिल्हा महिलाअध्यक्षा आश्विनी ठाकूर यांनी केली आहे.



या मागणीचे निवेदन ठाकूर यांनी पेण पोलिसांना दिले असून या कृत्याचा जाहीर निषेध व्यक्त करून लवकरात लवकर संबंधितांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी रिपब्लिकन सेनेच्या वतीने करण्यात आली आहे.

तसे न झाल्यास या विरोधात मोठे जन आंदोलन छेडू असा इशारा देण्यात आला आहे. यावेळी रिपब्लिकन सेनेचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ शिबिरात ४९ जणांचे रक्तदान

**कर्जत : प्रतिनिधी**

पाकिस्तानने केलेल्या पहलगामच्या भ्याड हल्ल्यावर आपण तोडीस तोड उत्तर देऊन ऑपरेशन सिंदूर फत्ते केले. त्यानंतर झालेल्या युद्धजन्य परिस्थितीत रक्ताची गरज भासल्यास आपण थोडीशी मदत करण्याचा प्रयत्न करण्यासाठी सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ आणि कपालेश्वर देवस्थान व्यवस्थापक समिती कर्जत यांच्या संयुक्त विद्यमाने समर्पण रक्त केंद्र घाटकोपर यांच्या सहकार्याने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ४९ जणांनी रक्तदान केले.



सार्वजनिक रक्तदाता राजाभाऊ कोठारी यांच्या हस्ते शिबिराचे उदघाट्न करण्यात आले. या प्रसंगी डॉ. रमेश सिंघ, अभिजीत मराठे, सदानंद जोशी, निलेश परदेशी, माजी नगरसेवक निलेश हरिश्चंद्रे, महेंद्र तेरेदेसाई, ललित पटेल आदी उपस्थित होते. राजाभाऊ कोठारी यांनी, रक्ताचा तुटवडा असल्याने रक्तदान शिबिरांचे आयोजन करण्यासाठी संस्था व नागरिकांनी पुढाकार घ्यावा.' अशी विनंती केली.

# तळा तालुक्यात वाळवणे सुकविण्यासाठी महिलांची लगबग

**तळा: प्रतिनिधी**

तळा तालुक्यात महिला वाळवणे सुकविण्या मध्ये व्यस्त झाल्या आहेत. महिलावर्गाकडून पावसाळ्यासाठी कडधान्य, पापड, मसाल्याचे पदार्थ अंगणात, इमारतीच्या गच्चीवर आदि ठिकाणी वाळवणे उन्हात टाकून ती खडखडीत सुकवून पॅकबंद डब्यात ठेवली जात आहेत.



कडधान्यांमध्ये वाल, मटकी, तुरडाळ, मुगडाळ, खोबरे, इत्यादी पदार्थ पावसाळ्यात चार महिने पुरतील एवढा साठा करून ठेवतात. जेणेकरून हे पदार्थ चांगले व दर्जेदार राहातील अशा पध्दतीने ठेवले जात आहेत. काही पदार्थ तर मिठ लावून सुकवून ठेवले जात आहेत. त्यामध्ये कैऱ्यांच्या फोडी करून त्या सुकवून ठेवल्या जात आहेत. त्यातच आता ग्रामीण भागातील महिलांचे उडदाचे, तांदळाचे पापड बनविण्याचे काम ही जोरात चालू आहे.

सध्या जंगलचा रानमेवा व आंबे झाले असल्याने लोणचेही भरण्याचे काम महिला वर्ग करत असल्याचे पहावयास मिळत आहे. समुद्र किनारी भागात व कोकण भागात सुकी मच्छीही चारमहिने पुरेल एवढ्या प्रमाणात खडखडीत सुकवून ठेवली जाते. त्याच बरोबर मच्छी खारवून (मिठाचा वापर करून )ठेवली जाते .परंपरेनुसार पुर्वी पासून वाळवणे घालण्याच्या पध्दतीमुळे आज महिला कामात गुंतल्या असताना देखिल वाळवणे घालून पावसाळ्यातील कडधान्याची सुविधा केली जात आहे.हे महिलांचे एक कुटुंबाचे आर्थिक बचत व नियोजन दिसत आहे.

पावसाळ्यात अनेक पदार्थ महागले जातात.त्याच बरोबर पावसाच्या पाण्याचाही त्यावर परीणाम होत असतो.सर्व बजेट बिघडण्याचा संभव असतो.या सर्व बाबींचा विचार करून महिला वर्ग पुर्वीपासूनच हे पावसाळ्यातील सर्व वस्तूंची साठवणूक हे एक कुटुंबाचे मोठे अर्थिक बजेट आहे.रश्मी कुडेकर म्हणतात, की आता उन्हाळ्यात आम्ही महीला पापड, कडधान्य,डाळी,मिरची,लोणचे, कोकमरस, इत्यादी पदार्थ वाळवण करून पावसाळ्यातील चार महिन्यांसाठी साठवण करून ठेवतो.यातून चांगली अर्थिक बचत होत असते.

# ओएसिस संस्थेचे गौतम बुद्धांना वंदन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ज्ञान आणि करुणेच्या कृतीउक्तीद्वारे विश्वातील समस्त मानवांचे मार्ग प्रदीप्त करणाऱ्या तथागत भगवान बुद्धांना आम्ही फक्त वंदन करत नाही, तर बुद्धांचा मार्ग जगतो. शिक्षण, जनजागृती आणि करुणेच्या कार्यातून आम्ही बुद्धांचे विचार समाजातरुजवतो. समाजसेवा हीच आमची त्यांना पुष्पांजली आहे, असे प्रतिपादन युवा सामाजिक कार्यकर्ते तथा ओएसिस संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रतिक कोळी यांनी केले आहे.

बुद्धपौर्णिमेनिमित्त मांडला विभागातील स्वयंसेवकांसोबत आयोजित परिसंवाद कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या साक्षी गायकवाड, ओएसिस संस्थेचे कार्याध्यक्ष यज्ञेश पाटील, सहखजिनदार सार्थक गायकवाड, स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर तथा बोर्ली-मांडला पंचक्रोशी परिसरातील स्वयंसेवक उपस्थित होते.

नेहरू युवा केंद्र संघटन, रायगड-अलिबाग आणि ओएसिस बहुउद्देशीय समाजाभिमुख संस्था, रेवदंडा यांच्या संयुक्त




विद्यमाने मांडला येथे बुद्धपौर्णिमेनिमित्त आत्मदीपो भव: या छोटेखाणी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तथा बुद्ध वंदनाने करण्यात आली. त्यानंतर संस्थेच्या उपस्थित पदाधिकाऱ्यांनी सर्व स्वयंसेवकांसह मार्गदर्शनपर संवाद साधत आगामी वर्षातील आयोजित कार्यक्रमांची माहिती स्वयंसेवकांना दिली.

साक्षी गायकवाड यांनी संस्थेच्या सामाजिक योगदानाचे तथा स्वयंसेवकांच्या सहभागाचे कौतुक करत बुद्धांच्या समाजभिमुख कार्यातील ओएसिसचा खारीचा वाटा बोधीवृक्ष प्रमाणे वृद्धिंगत व्हावा, अशा शुभेच्छा दिल्या. सुनियोजितआणि शिस्तबद्ध स्वरूपात संपन्न झाला

# रायगड जिल्ह्यात पुरेसा खत पुरवठा; आरसीएफचा दावा

**अलिबाग : प्रतिनिधी**

राष्ट्रीय केमिकल्स अँड फर्टिलायझर्स लिमिटेडच्या (आरसीएफ) थळ प्रकल्पामध्ये वार्षिक नियमित देखभाल व दुरुस्तीच्या कामासाठी नियोजित शटडाऊन करण्यात आला होता. मात्र, या शटडाऊनचा युरिया खताच्या उत्पादनावर किंवा पुरवठ्यावर कुठलाही नकारात्मक परिणाम झालेला नाही. आरसीएफ आणि जिल्हा कृषी विभाग यांच्या समन्वयामुळे रायगड जिल्ह्यातील युरियाचा पुरवठा अत्यंत सुरळीत असून, गेल्या वर्षीच्या मागणीपेक्षा अधिक खत शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी काळजी करू नये, असे आवाहन आरसीएफने केलेय.

मागील वर्षी ११, ५०० मेट्रिक टन युरियाची मागणी असताना, आरसीएफने ने १२०१९ मेट्रिक टन युरिया उपलब्ध करून दिला होता. गेल्या वर्षी रायगड जिल्ह्यात युरियाच्या टंचाईबाबत एकही तक्रार आली नव्हती आणि यंदाही तीच परंपरा कायम राहील, असा विश्वास आरसीएफने व्यक्त केला आहे.

यंदाच्या खरीप हंगामासाठीदेखील २२९३२ मेट्रिक टन युरियाची मागणी करण्यात आली आहे, त्यापैकीप४४०.४१ मेट्रिक टन युरिया आधीच वितरित करण्यात आला आहे. उर्वरित युरिया साठा पुढील ४.५ महिन्यांत नियोजितपणे पुरवण्यात येणार आहे. सध्या स्थानिक वितरकांकडेन ७७२. ५५५ मेट्रिक टन युरिया साठा उपलब्ध असून, शेती हंगाम सुरळीत पार पाडण्यासाठी कोणतीही अडचण नाही, असे आरसीएफने स्पष्ट केले आहे.

शेतकऱ्यांनी भीती न बाळगता शेती कामे अधिक जोमाने सुरू ठेवावीत. यंदाचा मान्सून वेळेत येणार असून, शेतकऱ्यांनी तयारी नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण करावी. शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी आरसीएफ कटिबद्ध आहे, असे आरसीएफ थळचे वरिष्ठ जनसंपर्क अधिकारी डॉ. राकेश कवळे यांनी सांगितले.

# बंडू खंडागळे गुरव समाजाच्या अध्यक्षपदी




**मोहोपाडा : प्रतिनिधी**

गुरव समाज रायगड, ठाणे, मुंबई संस्थेच्या रायगड जिल्ह्यातील सावरसई येथे झालेल्या संस्थेच्या कार्यकारणी सर्वसाधारण सभेत संस्थेचे विद्यमान अध्यक्ष- बंडू विरेश्वर खंडागळे यांची एक मताने पुन्हा एकदा २०२५ ते २०२९ पाच वर्ष कालावधी करिता सर्व सदस्य यांची सभागृहामध्ये हात वरती करून निवड करण्यात आली. या वेळी आजपर्यंत निधन झालेले गुरव समाज बांधव, त्याचबरोबर सध्या भारत पाकिस्तान युद्ध सुरू असल्याने देशाच्या हिंदुस्थानाच्या सीमेवर आजपर्यंत ज्यांना वीरमरण आले आणि शहीद झालेल्या आपल्या वीर सैनिकांसाठी तसेच संस्थेचे विद्यमान खजिनदार कै भाऊ शंकर दळवी यांचे नुकतेच निधन झाले. यांच्यासाठी संपूर्ण कार्यकारी मंडळाने सभागृहात दोन मिनिट उभे राहून श्रद्धांजली दिली.

यावेळी नुकत्याच झालेल्या राष्ट्रीय गुरव समाज महासंघाच्या संभाजीनगर येथील सर्वसाधारण बैठकीतील संपूर्ण महाराष्ट्रातील गुरव समाज बांधवांसाठी नव्याने सॉफ्टवेअर- ॲप्स तयार झाला असल्याने त्या बाबतीत गुरव बांधवांचे संघटन करण्यासाठी आणि राज्यातील गुरव समाजाची संख्या किती आहे. हे समजण्यासाठी त्याचा फायदा समाज बांधवांना कसा होईल. त्याच बरोबर श्री संत काशिबा महाराज आर्थिक विकास युवा महामंडळ आणि राज्य सरकारकडे प्रलंबित असलेला देवस्थान अधिनियम विश्वस्त कायदा विधेयक दुरुस्ती करण्याबाबत

# महाडमधील अवैध मटका व्यवसाय पुन्हा ऐरणीवर

## समाजसेवक सुभाष मोरे करणार आत्मदहन

**महाड : प्रतिनिधी**

महाड मध्ये मटका, जुगार, भिंगरूट अशा प्रकारचे व्यवसाय बंद करावेत अशी मागणी सातत्याने करून दिली हे व्यवसाय खुलेआम सुरूच असल्याने याबाबत आता समाजसेवक सुभाष मोरे यांनी प्रशासनाच्या विरोधात आत्मदहनाचा इशारा दिला आहे.

ऐतिहासिक महाड शहर ही छ.शिवाजी महाराज, महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर, या महामानवांच्या पदस्पर्शाने पावन झालेली भूमी आहे. राजकीय, सांस्कृतिक, सामाजिक क्षेत्रातील दिग्गज या महाड क्रांतीभूमीने दिले आहेत. अशा ऐतिहासिक शहरात गेली अनेक वर्ष खुलेआम मटका, ऑनलाईन लॉटरी, आणि सोशल क्लबच्या नावाखाली पत्त्याचे डाव रंगत आहेत. याबाबत सातत्याने मटका हे बेकायदेशीर व्यवसाय बंद व्हावेत म्हणून मागणी होत आहे. गल्लीत दिसणारी मटका दुकाने आता थेट रस्त्यावर टपरी टाकून खुलेआम सुरु करण्यात आली आहेत. महाड शहरात नवीन येणाऱ्या अधिकाऱ्यांकडून तात्पुरती धमक दाखवत हे व्यवसाय कांही दिवसांकरिता बंद ठेवले जातात मात्र अवघ्या कांही दिवसात हे व्यवसाय पुन्हा सुरु केले जातात. महाडमध्ये सुरु असल्याने याबाबत आता समाजसेवक सुभाष मोरे याने आत्मदहनाचा इशारा दिला आहे.



## जाहीर प्रसिध्दीकरण

पुढे नमुद केलेल्या सहकारी संस्थेचे सन २०२५-२६ ते २०२९-३० या कालावधीतील पंचवार्षिक निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम आज दि. १३/०५/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यांत येत आहे. संस्थेचे नावः **ज्वेल गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित उर्मोली, ता. पनवेल, जि. रायगड.** सदर कार्यक्रमानुसार नामनिर्देशन पत्र स्विकृती दि. १४/०५/२०२५ ते १९/०५/२०२५, नामनिर्देशन पत्र छाननी दिनांक २०/०५/२०२५, नामनिर्देशन माघारी दि. २२/०५/२०२५ ते ०५/०६/२०२५ व आवश्यकतेनुसार मतदान दि. १५/०६/२०२५ रोजी घेण्यात येईल. तपशिलवार निवडणूक कार्यक्रम, निवडणुकीबाबत सुचना व अधिक माहिती संस्थेचे कार्यालयात, निवडणुक निर्णय अधिकारी कार्यालय, **संस्था कार्यालयः- ज्वेल गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित उर्मोली, ता. पनवेल, जि. रायगड.** कार्यालयात पाहावयास मिळेल. तरी संस्थेच्या सभासदांनी यांची नोंद घ्यावी.

**सही/-**
**संदेश नंदकुमार महाडीक**
निवडणूक निर्णय अधिकारी प्राधिकृत अधिकारी,
कोकण विभाग पॅनल अ.क्र. वर्ग 'क' ०६/'ई'
०९ ज्वेल गार्डन सहकारी गृहनिर्माण संस्था
मर्यादित उर्मोली, ता. पनवेल, जि. रायगड.

## भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्रातून होणाऱ्या
# पाणीपुरवठ्याबाबत आवाहन

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

मोरबे मुख्य जलवाहिनीवरील आग्रोळी ब्रीजजवळ रेल्वे ट्रॅकलगत व चिखले गावाजवळील ब्रीजखाली जलवाहिनी वारंवार गळती होत असल्याने, सदर ठिकाणची जलवाहिनी बदलण्याच्या दुसऱ्या टप्प्यातील काम नवी मुंबई महापालिकेमार्फत बुधवार दि.१४ मे २०२५ रोजी हाती घेण्यात येणार आहे.

त्यासाठी भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र येथून नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रास होणारा पाणी पुरवठा बुधवार, १४ मे २०२५ रोजी, दुपारी १२.०० ते गुरुवार, १५ मे २०२५ रोजी, दुपारी १२.०० वाजेपर्यंत २४ तासांकरिता बंद राहणार आहे.



त्यामुळे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील बेलापूर, नेरुळ, वाशी, तुर्भे, सानपाडा, कोपरखैरणे, घणसोली व ऐरोली या विभागांमध्ये बुधवार, १४ मे २०२५ रोजी संध्याकाळी आणि गुरुवार, दि. १५ मे २०२५ रोजी सकाळचा पाणी पुरवठा होणार नाही याची नागरिकांनी कृपया नोंद घ्यावयाची आहे. तसेच गुरुवार, १५ मे २०२५ रोजी संध्याकाळी कमी दाबाने व अपुरा पाणीपुरवठा होईल.

बुधवार दि.१४ मे २०२५ रोजी, दुपारी १२.०० ते गुरुवार दि.१५ मे २०२५ रोजी, दुपारी १२.०० वाजेपर्यंत २४ तासांकरिता नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जलवाहिनीवरील थेट नळ जोडण्यांचा व सिडको क्षेत्रातील खारघर व कामोठे नोड मधील पाणी पुरवठा देखील बंद राहील याचीही नोंद घ्यावयाची आहे.

याद्वारे नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील नागरिकांना आवाहन करण्यात येते की, या कालावधीत पाण्याचा जपून वापर करुन नवी मुंबई महानगरपालिकेस सहकार्य करावे.

# आमदार मंदा म्हात्रेंच्या निधीमधून वाशीत निवारा शेड, कट्टा लोकार्पण

**नवी मुंबई : प्रतिनिधी, बातमीदार**

आमदार मंदा म्हात्रे यांच्या आमदार निधीमधून १५ लाख रुपये खर्च करून वाशी सेक्टर ६, येथे उभारण्यात आलेल्या ज्येष्ठ नागरिक कट्टा व निवारा शेडचा लोकार्पण सोहळा ह.भ.प. बाबू भगत, मराठी साहित्य मंदिर अध्यक्ष सुभाष कुलकर्णी व ज्येष्ठ नागरिक रामानंद जेट्टी यांच्या हस्ते सोमवारी (दि.१२) झाले.



या वेळी आमदार मंदा म्हात्रे म्हणाल्या की, वाशीतील विविध क्षेत्रातील ज्येष्ठ नागरिकांनी ज्येष्ठ नागरिक कट्टा व निवारा शेड उभारण्यात यावे, अशी मागणी केली होती. त्याच अनुषंगाने जे बोलते ते करते याच युक्तीनुसार वाशी सेक्टर ६, शिवसंकल्प पतपेठी जवळ ज्येष्ठ नागरिक विरंगुळा केंद्र व निवारा शेड बांधून तो ज्येष्ठ नागरिकांच्या सेवेसाठी सोमवारी खुला करण्यात असल्याचे आमदार मंदा म्हात्रे यांनी सांगितले.

या वेळी आमदार मंदा म्हात्रे यांच्या समवेत अनिल कौशिक, माजी नगरसेवक राजू शिंदे, वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, माजी वाशी मंडळ अध्यक्ष मंगेश चव्हाण, विक्रम पराजुली, प्रताप भोसकर, रामकृष्ण अय्यर, नाथा सरगर, अविनाश भगत, नंदकुमार भगत, महेश दरेकर, जयंत पाटील, वसाराम राजपूत, अरुण शिरसाट, राखी पाटील, कामिनी भगत, क्षितिजा घोरपडे, मालती सोनी, सुमा रणजीत, तसेच असंख्य ज्येष्ठ नागरिक व महिला उपस्थित होते.

विरंगुळा केंद्र आणि निवारा शेडच्या सोयीमुळे वाशी विभागातील ज्येष्ठ नागरिकांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून आमदार मंदा म्हात्रे यांचे ज्येष्ठ नागरिकांनी आभार मानले आहेत.

# गौतम बुद्ध जयंतीनिमित्त आधारवड वृद्धाश्रमात अन्नदान

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या २५६९व्या जयंतीनिमित्त नवयान फाउंडेशनच्या वतीने कोपरखैरणे येथील आधारवड निराधार वृद्ध आश्रम येथे अन्नदानाचा उपक्रम आयोजित केला होता.

बौद्ध धर्मामध्ये दानाला दिले जाणारे महत्त्व लक्षात घेऊन हा सामाजिक उपक्रम नवयान फाउंडेशनमार्फत राबविण्यात आला. या वेळी फाउंडेशनचे प्रमुख योगेश काकडे, सचिन कटारे, राजेंद्र झेंडे, शिल्पा रणदिवे, योगी काकडे, तुषार जवादे, विपुल जाधव, त्रिया जवादे, गायत्री पाटील, स्पंदन कटारे आदि सह फाउंडेशनच्या अनेक सदस्यांनी उपस्थित राहून वृद्धाश्रमातील वृद्धांना अन्नदान करत मानवी संवेदनशीलतेचे दर्शन घडवले. या उपक्रमामुळे वृद्धांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.

नवयान फाउंडेशनकडून अशा उपक्रमांचे सातत्याने आयोजन करण्यात येत असून, यापुढेही समाजोपयोगी कार्य सुरू ठेवण्याचा निर्धार सचिन कटारे यांनी व्यक्त केला.



# जुगार अड्ड्यावर पोलिसांची कारवाई



**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली येथील बीमा कॉम्प्लेक्स येथे सुरू असलेल्या जुगार अड्ड्यावर पोलिसांनी छापा मारून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी येथे जुगार खेळणाऱ्या पाच जणांना ताब्यात घेतले तसेच या जुगार खेळणाऱ्या या मंडळीकडून १३ हजार ०५५ रुपयांची रोख रक्कमही पोलिसांनी जप्त केली.

स्टील मार्केट, तिसरा मजला, बीमा कॉम्प्लेक्स, कळंबोली या ठिकाणच्या एका गाळ्यात सुरू असलेल्या जुगार अड्ड्यात काही मंडळी तीन पत्ता जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. या माहितीनुसार, पोलिसांनी येथे छापा मारला असता तेथे पाच जण तीनपत्ती जुगार खेळताना आढळले. त्यावर पोलिसांनी त्यांना ताब्यात घेत तेथून १३ हजार ५५० रुपयांची रोकड जप्त केली. या प्रकरणी गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# आज वाशी सेक्टर १२ मध्ये मॉक ड्रिल

**नवी मुंबई : बातमीदार**

केंद्रीय गृह विभागाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार आपत्कालीन परिस्थितींसाठी सज्जता तपासण्यासाठी ऑपरेशन अभ्यास या मॉक ड्रिलचे आयोजन ठाणे जिल्ह्यातील नीलसिद्धी टॉवर, ए आणि बी विंग, एनएमएमटी टर्मिनस जवळ, प्लॉट नं. ९५, सेक्टर १२, वाशी, नवी मुंबई येथे मंगळवारी (दि.१३) दुपारी ४ वाजता करण्यात आले आहे.



हे मॉक ड्रिल जिल्हाधिकारी तथा नागरी संरक्षण दलाचे नियंत्रक अशोक शिनगारे, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ.कैलास शिंदे, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.संदीप माने, अतिरिक्त आयुक्त सुनील पवार, प्रांताधिकारी उर्मिला पाटील व शहर अभियंता तथा मुख्य अग्निशमन अधिकारी शिरीष आरदवाड, नागरी संरक्षण दलाचे उपनियंत्रक विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली तहसिलदार उमेश पाटील यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात येणार आहे.

सर्व यंत्रणांनी या मॉक ड्रिलला गांभीर्याने घ्यावे. केंद्रीय गृह विभागाने दिलेल्या सर्व मार्गदर्शक सूचनांचे पालन करून यशस्वीरित्या ही मॉक ड्रिल पार पाडावी. मॉक ड्रिलच्या दरम्यान सूचना मिळाल्यानंतर दुपारी ४.०० वाजता सायरन वाजवून नागरिकांना धोक्याचा इशारा दिला जाईल.

या दरम्यान नागरिकांनी घाबरू नये, अफवांवर विश्वास ठेवू नये, सेल्फी काढू नये आणि प्रशासनाकडून दिलेल्या सूचनांचे पालन करावे, हे मॉक ड्रिल केवळ पूर्वतयारीचा भाग असून कोणतीही खरी आपत्ती उद्भवलेली नाही, हे लक्षात घ्यावे, असे आवाहन तहसिलदार उमेश पाटील यांनी केले आहे.

**मॉक ड्रिलमध्ये होणारा घटनाक्रम**

सायरन वाजणार, Air Strike/ बॉम्ब हल्ल्याची सूचना मिळणार, सर्व नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहचण्यासाठीच्या सूचना दिल्या जाणार, धावाधाव, गडबड न करता नागरिकांना सुरक्षित ठिकाणी पोहोचविले जाईल, संबंधित परिसरात शोध मोहीम घेवून जखमी, अडकलेल्या नागरिकांची तात्काळ सुटका करणे, त्यांना प्रथमोपचार करणे, ही कार्यवाही करण्यात येईल.

# उन्हामुळे शीतपेयांना वाढली मागणी
## उसाचा रस, लिंबू सरबत पिण्याकडे नागरिकांचा कल वाढला

**चिरनेर : प्रतिनिधी**

उन्हाचा तडाखा वाढल्याने होणारी अंगाची काहिली मिटविण्यासाठी नागरिक शीतपेय पिण्यास पसंती देऊ लागले आहेत.

उन्हाची तीव्रता वाढल्याने उन्हाळ्यात शरीरातील पाण्याचे प्रमाण झपाट्याने कमी होते. त्यामुळे शरीराची तहान भागवण्यासाठी लिंबू सरबत, उसाचा रस आदींसह दुग्धजन्य थंड पेयांना मोठी मागणी वाढली आहे. एकूणच शीतपेयांना मागणी वाढली असून, लिंबू सरबत, उसाच्या रसवंतीगृहात नागरिकांची गर्दी वाढली असल्याचे चित्र शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही पाहायला मिळत आहे. उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असल्यामुळे नागरिक हैराण होत आहेत. त्यामुळे विविध मोक्याच्या ठिकाणी थंड पेयांची दुकाने थाटली असल्याचे पाहायला मिळत आहे.



उन्हापासून दिलासा मिळविण्यासाठी नागरिकांनी उसाचा रस, लिंबू सरबत व कोकण सरबत आदी थंड पेयांना पसंती दिली आहे. त्यामुळे सर्व स्टॉलवर शीतपेये हमखास मिळत आहेत. उरण पनवेल मध्ये काही मोक्याच्या ठिकाणी असलेल्या स्टॉलवर मोसंबी गाजर तसेच इतर फळांचा ज्यूस पिण्यासाठी नागरिक मोठी गर्दी करत आहेत. तर बच्चे कंपनी कालाखट्टा, कच्ची कैरी, मिल्क शेक तसेच बर्फाचा गोळा खाण्याचा आनंद घेत आहेत.

**रसवंतीगृहावर नागरिकांची गर्दी**

शहरी भागाबरोबर ग्रामीण भागातही रसवंतीगृहे थाटली गेली आहेत. चिरनेर येथील संदीप गोंधळी व संग्राम गोंधळी या रसवंती गृहाच्या मालकांबरोबर संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की आम्ही गेले कित्येक वर्ष शेतात उसाचे पीक घेत आहोत. त्यामुळे दररोज ऊस तोडून ग्राहकांना थंडगार ताजा उसाचा रस प्यायला देतो. आमच्या दुकानात उसाचा ताजा रस मिळत असल्यामुळे ग्राहकांची मोठी गर्दी होत असते. पावसाला सुरुवात होईपर्यंत आमचे रसवंतीगृह सुरू असते. अशी माहिती गोंधळी बंधूंनी दिली.

# राकेश खराडे मावळ लोकसभा प्रसिध्दीप्रमुखपदी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

अखिल आर्यव्रत संघ, आंतरराष्ट्रीय बजरंग दल पदनियुक्ती कार्यक्रम रसायनी मोहोपाडा येथील श्री साई बाबा मंदीराच्या सभागृहात सोमवारी (दि.१२)झाला. या कार्यक्रमाला आंतरराष्ट्रीय बजरंग दलाच्या हिंदू रक्षक बजरंग बांधवांच्या नियुक्त्या जाहिर करुन निवड पत्र वाटप करण्यात आले.

मावळ लोकसभा प्रसिद्धीप्रमुखाची जवाबदारी सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार राकेश खराडे यांच्यावर सोपविण्यात आली. त्यांना नियुक्ती झाल्याचे निवडपत्र तपस्वी श्री आचार्य महामंडलेश्वर आघोर, कोकण प्रांत महामंत्री सचिन खुळे, कोकण प्रांत संघटक सचिन धूळे यांच्याहस्ते प्रदान करण्यात आला. या वेळी मातृशक्ती अध्यक्ष भक्तीताई बाबर, जिल्हाध्यक्ष बाबू भोईर, ठाणे जिल्हाध्यक्ष बादशहा म्हस्कर, हभप वामन महाराज भोईर आदी उपस्थित होते.

या वेळी उरण विधानसभा अध्यक्षपदावर जनार्दन मालुसरे, उरण, विधानसभा गोरक्षकपदी मलेश गुडसे, उरण विधानसभा संघटक सतीश महाडीक, खालापूर तालुका अध्यक्ष प्रशांत तांबोळी, उपाध्यक्ष संदिप तांबोळी आदीसह खालापूर रसायनी पाताळगंगा परिसरातील नियुक्त्या जाहिर करून निवड पत्र वाटप करण्यात आले. या वेळी बजरंग बांधव उपस्थित होते.



# पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जे. एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या श्रीक्षेत्र पंचायतन मंदिराचा तृतीय वर्धापन दिन सोहळा मंगळवार १३ मे रोजी संपन्न होत आहे. या सोहळ्यात हरिपाठ, श्रींची पालखी, मिरवणूक, दिंडी सोहळा, संगीत भजन, ह. भ. प. गणेश महाराज फुलकुंठवार यांचे कीर्तनाच्या आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन प्रीतम जनार्दन म्हात्रे यांनी केले आहे.



# नरेश नारंगीकर यांचा अवयवदानाचा निश्चय

**उरण : प्रतिनिधी**

अवयव दान हेच सर्व श्रेष्ठदान असून, मरणोत्तर अवयव दान करणाऱ्या उरण तालुक्यातील चिरनेर गावचे भूमिपुत्र नरेश तुकाराम नारंगीकर यांनी आपल्या ५१व्या वाढदिवसानिमित्त कोणत्याही प्रकारचा गाजावाजा न करता, मृत्यूनंतर आपल्या शरीरातील अवयवांचा उपयोग दुसऱ्यांचे जीवन खुलवण्यासाठी व्हावा, दुसऱ्यांच्या जीवनाला जीवदान मिळावे, म्हणून मृत्युंनंतर स्वतःच्या शरीरातील अवयवदान करण्याचा संकल्प त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने केला असून, त्यांनी शासकीय रुग्णालयात जाऊन मृत्युंनंतरच्या अवयव दानासाठीच्या फामलिटीचा अधिकृत रित्या फॉर्म भरून दिला आहे.



व्यवसायाने घर बांधणी मिस्त्री काम करीत असलेल्या मरावे परी कीर्तिरूपे उरावे अशा नरेश नारंगीकर यांनी आपल्या मृत्यूनंतर स्वर्गवासी झाल्यावर गरीब-गरजू अंधत्वाचे जीवन प्रकाशमय होण्यासाठी किंवा एखाद्या अपघातग्रस्त रुग्णाला आपल्या अवयवांचा उपयोग व्हावा यासाठी स्वईच्छेने अवयव दान करण्याचा निश्चय केला आहे. शरीर हे नश्वर आहे पण आत्मा अमर आहे. असे म्हटले जाते, पण आजच्या युगात विज्ञानाने इतकी प्रगती केली आहे. की, हे नश्वर शरीर हे दुसऱ्या एखाद्या व्यक्तीच्या जीवनात आनंद निर्माण करू शकतो.

नरेश नारंगीकर यांच्या वाढदिवसदिनी केलेला अवयव दानाचा संकल्प म्हणजे या परिवारासाठी अभिमानास्पद असा दिवस, मृत्यूनंतर हे नश्वर शरीराचे राखेत रूपांतर होण्याआधी या शरीराचा एखादा अवयव दुसऱ्या एका व्यक्तीच्या कुटुंबाच्या जीवनात आनंद निर्माण करणारा होईल. याचा या परिवाराला निश्चित अभिमान असावा.

शंभर वर्ष रस्त्यातील दगड होऊन जगण्यापेक्षा जाई - जुईच्या झाडावरच फुल होऊन दोन दिवस जगाव समाजाला सुगंधातून आनंद द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करून अवयव दान करण्याचा निश्चय करणारे नरेश नारंगीकर यांचे विभागातून सर्वच स्तरातून कौतुक होत आहे.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरूड : खोरा बंदरात अवेळी पावसानंतर समुद्राचे पाणी वाढले आहे. लाटांचा मारा सुरू होत आहे. २५ मेनंतर खोरा बंदरातून किल्ल्यात जाणारी जलवाहतूक बंद होणार आहे.** (छाया : सुधीर नाझरे)

# साखर गावाला विकास निधीची कमतरता पडू देणार नाही -मंत्री गोगावले

**पोलादपूर : प्रतिनिधी**

एखाद्याला शब्द दिला तर आम्ही कधी मागे हटत नाही, कारण आम्ही छत्रपती शिवाजी महाराज, नरवीर तानाजी मालुसरे यांच्या कुशीतले मावळे आहोत. त्यामुळे येणाऱ्या काळामध्ये विकासाच्या बाबतीत साखर गावाला निधीची कमतरता पडू देणार नाही, अशी ग्वाही मंत्री भरत गोगावले यांनी पोलादपूर तालुक्यातील साखर गावातील शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. त्यावेळी दिली.



या कार्यक्रमाला शिवसेनेचे सहसंपर्कप्रमुख चंद्रकांत कळंबे, तालुका प्रमुख निलेश अहिरे, विभाग प्रमुख लक्ष्मण मोरे, नगरपंचायत बांधकाम सभापती सिद्धेश शेठ, नगरसेवक नागेश पवार, विभाग प्रमुख तानाजी निकम, उपतालुकाप्रमुख संजय मोदी, बांधकाम कामगार सेना तालुका अध्यक्ष दत्ताराम मोरे, काशिनाथ कुंभार, नारायण साने, यांसह युवासेना, महिला आघाडी व इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पोलादपूर तालुक्यातील गेल्या अनेक वर्ष काँग्रेस पक्षाचा बालेकिल्ला राहिलेल्या साखर गावातील शेकडो ग्रामस्थांनी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री भरत गोगावले यांच्या प्रमुख उपस्थितीत शिवसेनेत जाहीर पक्ष प्रवेश केला. यावेळी भरत चोरगे, संजय चोरगे, पांडुरंग चोरगे, स्वप्निल चोरगे, गणेश मालुसरे, सुनिल मालुसरे, सरपंच सौ. मुकणे, प्रकाश कदम, प्रभाकर पवार, नारायण तांदळेकर, साखर बोरज बौद्धजन मंडळाचे अध्यक्ष संजय खैरे, सचिव प्रविण पवार यांसह शेकडो कार्यकर्त्यांनी शिवसेनेत प्रवेश केला. साखर गावातील माजी सरपंच भरत चोरगे यांच्या पुढाकारातून संपूर्ण ग्रामस्थांनी शिवसेनेचा भगवा हाती घेत विकासाच्या दिशेने एकसंघ पाऊल टाकले.

माजी सरपंच भरत चोरगे यांनी आपल्या मनोगतात, शिवसेनेच्या कार्यपद्धती आणि विकासाभिमुख दृष्टिकोनाने प्रेरित होऊन हा निर्णय घेतला असून, गावाच्या प्रगतीसाठी हा टप्पा निर्णायक ठरणार आहे,अशी आशा व्यक्त केली.

साखरगावाच्या या प्रवेशामुळे देवळे जिल्हा परिषद मतदारसंघात शिवसेनेची ताकद वाढली असून आगामी राजकीय समीकरणात हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे राजकीय जाणकारांकडून बोलले जाते




**अलिबाग :आमदार महेंद्र दळवी यांना वाढदिवसानिमित्त शिवसेनेचे मुरुड तालुका बांधका अध्यक्ष दिनेश मिणमीने, शिवसेनेचे युवा नेते दीपेश वरणकर, उपसरपंच निलेश तांबडकर, माजी सरपंच हरिश्चंद्र भेकरे, अविनाश शिंदे आदी उपस्थित होते.**

## वाहनांच्या अपघातात कार जळून खाक

**खालापूर : प्रतिनिधी**

कर्जत चौक रस्त्यावर वावरले गावाच्या हद्दीत बाबा डेअरी जवळ दोन वाहने एकमेकांना धडकली आणि ईर्टीका गाडीचा सिलिंडर फुटला यामधे गाडीला आग लागून संपूर्ण गाडी आगीच्या भक्ष्यस्थानी पडली कर्जत नगरपालिकेची अग्निशमन दलाचे जवान घटनास्थळी धाव घेत आगीवर नियंत्रण मिळवले, परंतु गाडी पुर्ण जळून खाक झाली होती.

दुसरा अपघातात पेट्रोल पंप कर्मचारी जखमी खोपोली पेण रस्त्यावर वावोशी जवळ



अपघात वावोशी वनवठे गावाजवळ झाला अंगावर इंडियन ऑइल पेट्रोल पंपाचे कपडे असणाऱ्या धनाजी लबडे (४३ रा. वारद खालापूर) या जखमी व्यक्तीला खोपोली येथील डॉ जाखोटीया हॉस्पिटल मध्ये दाखल करण्यात आले.

## अंगणवाडी बालकांना चविष्ट भोजनाचा स्वाद

**मुरूड : प्रतिनिधी**

अलिबाग मुरूड विधानसभा क्षेत्राचे कार्यसम्राट आमदार महेंद्र दळवी यांच्या ५९ व्या वाढदिवसानिमित्ताने समाजसेवक अरविंद गायकर यांनी आमदार दळवी यांना दीर्घायुष्य प्राप्त व्हावे यासाठी शिघरे नवी वाडी अंगणवाडीयेथील तीस विद्यार्थी व विद्यार्थिनींना चविष्ट शाकाहारी भोजन देण्यात आले. अंगणवाडी येथील विद्यार्थ्यांना चविष्ट भोजन मिळाल्यामुळे सर्व मुलांचे चेहरे फुलले होते.



समाजसेवक अरविंद गायकर यांनी हा एक सामाजिक उपक्रम राबवून भोजनाचा कार्यक्रम घडवून आणला होता. शीघ्रे नवी वाडी अंगणवाडी येथे आदिवासी मुले शिकत असून त्यांना चपाती भाजी व शाकाहारी बिर्याणी व केळे असे भोजन देण्यात आले.यावेळी समाजसेवक अरविंद गायकर यांच्या समवेत प्रतिभा गायकर, अंगणवाडी सेविका भारती ठाकूर व शिवसेनेचे मुरुड तालुका बांधकाम कामगार सेनेचे अध्यक्ष दिनेश मिणमीने हे उपस्थित होते.

## माणगावात उद्या नेत्र तपासणी शिबिर



**माणगाव : प्रतिनिधी**

शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेल विजयशेठ मेथा चॅरिटेबल ट्रस्ट माणगाव यांच्यातर्फे मोफत नेत्र तपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन बुधवार दि. १४ मे २०२५ रोजी सकाळी ९ ते दुपारी २ यावेळेत जुने एसटी स्टँड जवळ व महेंद्र पितांबर मेथा यांच्या हॉलमध्ये करण्यात आले आहे.

या शिबिराचा लाभ जास्तीत जास्त गरीब गरजू लोकांनी घ्यावा असे आवाहन सामाजिक कार्यकर्ते तथा प्रसिद्ध उद्योजक विजयशेठ मेथा यांनी केले आहे.

## श्रीवर्धन नगर परिषदेची नालेसफाईला सुरुवात

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

मान्सूनपूर्व तयारीचा एक भाग म्हणून श्रीवर्धन नगरपरिषदेमार्फत शहरातील सर्व प्रमुख नाल्यांची सफाई मोहीम जोरात सुरू आहे. बाजारपेठ, नारायण पाखाडी, जिवनेश्वर, आणि इतर नाले याठिकाणी मोठ्या प्रमाणात गाळ आणि कचरा काढण्याचे काम युद्धपातळीवर राबवले जात आहे. या कामामुळे नागरिकांत समाधानाची भावना आहे, तर शहर स्वच्छ आणि सुरक्षित राहण्याच्या दिशेने मोठे पाऊल उचलले गेले आहे.



मुख्याधिकारी विराज लबडे यांच्या प्रभावी नेतृत्वाखाली नालेसफाईचे काम अत्यंत नियोजनबद्ध आणि शिस्तबद्ध पद्धतीने पार पडत आहे. त्यांनी प्रत्यक्ष ठिकाणी जाऊन प्रत्येक टप्प्याचे निरीक्षण केले असून, सफाई कामगारांशी संवाद साधून त्यांना योग्य दिशा आणि प्रोत्साहन दिले आहे. त्यांच्या तत्पर कार्यपद्धतीमुळे शहरवासीयांमध्ये त्यांच्या कार्यक्षमतेचे विशेष कौतुक होत आहे.

दरवर्षी पावसाळ्याच्या काळात नाल्यांमध्ये गाळ, प्लास्टिक कचरा, पालापाचोळा साचल्याने पाणी तुंबते आणि रस्त्यांवर पूरसदृश स्थिती निर्माण होते. यंदा मात्र अशा समस्यांना तोंड द्यावे लागू नये म्हणून नगरपरिषदेने वेल इन ॲडव्हान्स कामाला सुरुवात केली आहे,

सध्या सुरू असलेल्या कामात जेसीबी, ट्रॅक्टर, ट्रॉली, तसेच अनेक सफाई कर्मचारी सहभागी असून नाल्यांत साचलेला गाळ, प्लास्टिक, कुजलेली झाडाझुडपं इत्यादी पूर्णपणे दूर केली जात आहेत. ही संपूर्ण मोहीम आगामी दोन आठवड्यांत पूर्ण करण्यात येणार आहे.

# परिचारिका दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालयातील परिचारिकांचा सत्कार

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक उपक्रमात रायगड जिल्ह्यात नावलौकिक कमाविलेल्या माणगाव शिवजयंती उत्सव व रक्तदान शिबिर सेवाभावी संस्थेतर्फे सोमवारी (दि.१२) रोजी आंतरराष्ट्रीय परिचारिका दिनानिमित्त उपजिल्हा रुग्णालय माणगाव येथील परिचारिकांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष सलीम शेख,कार्याध्यक्ष तथा राजिपचे माजी शिक्षण व आरोग्य समिती सभापती ज्ञानदेव पवार,उपजिल्हा रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक डॉ. अरुणा पोहरे, वैद्यकीय अधिकारी डॉ.दिपक देशमुख, डॉ.जगदीश पटेल, संस्थेचे सचिव शंकर शिंदे, सल्लागार निर्मलसिंग रंधावा,किशोर झेमसे, रक्तदान शिबिर समितीच्या सल्लागार अपूर्वा जंगम, सदस्या शुभांगी सोनावणे, सामाजिक कार्यकर्ते संजय गांधी आदींसह उपजिल्हा रुग्णालयातील कर्मचारी व परिचारिका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आधुनिक नर्सिंगच्या प्रणेत्या फ्लोरेन्स नाइटिंगेल यांच्या जयंती निमित्त दरवर्षी १२ मे हा दिवस आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन म्हणून



साजरा केला जातो. माणगाव उपजिल्हा रुग्णालयात दरवर्षी हा दिवस मोठया उत्साहात साजरा केला जातो. यावर्षीही रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षक अरुणा पोहरे यांच्या प्रमुख उपस्थितीत केक कापून आंतरराष्ट्रीय परिचारिका दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमात उपजिल्हा रुग्णालयातील सहाय्यक अधिसेवीका लता राठोड, परिसेविका शिवकांती गवळी, अर्चना मोकाशी, तेजस्विनी सुखदरे,सानिका पवार, अस्मिता तांबडे, अधिपरिचारिका अस्मिता सारंग,रुपाली शिबे,अनिता करकरे, वनिता तेटगुरे, निकिता चौधरी, दीपाली नेमाणे, सोनाली गजने, सुरज महाडिक, अपर्णा उपाध्ये, निकिता सोनावणे, श्रूती चव्हाण, लता माजीक, प्रगती कदम,स्मिता सावळकर, नीता राठोड, श्रद्धा शिंदे, शामल दळवी, शीतल शेंडगे, प्रणिता मनवळ, माधुरी कोकरे, साक्षी शिर्के, तनुजा पाटील, तृप्ती पाटोळे,स्नेहल सावंत, शिवानी गोंधळी, ऋतिक चोगले, सोनाली मांगले, अनुराधा राऊत, शुभांगी वाघमारे, पूर्वजा पाटील, विनिता वारेकर, मौलिका सोलंकी आदी परिचारिकांचा सत्कार केला.

## पावसाआधी कोळीवस्तीत बगी, वाजवत सुकलेली मासळी साठवण्याची लगबग

**श्रीवर्धन: प्रतिनिधी**

पावसाळ्याची चाहूल लागताच श्रीवर्धन तालुक्यातील समुद्रकिनारी वसलेल्या कोळीवाड्यांमध्ये एक वेगळीच लगबग दिसून येते. जीवना कोळीवाडा, दांडा, मुळगाव, आदगाव, दिघी, भरटखोल आदी गावांतील कोळी बांधवांनी सुकट व इतर सुकवलेली मासळी साठवण्याची तयारी जोरात सुरू केली आहे.

मासेमारी हंगाम संपण्याच्या मार्गावर असून, जून महिन्यापासून मासेमारी बंदी लागू होणार असल्याने या काळात जवला, कोळंबीचे सोडे, छोटी बगी, अंबाड, मांदेली यांसारख्या छोट्या माशांची खरेदी व सुकवण्याचे काम सुरू आहे. कोळीवस्त्यांतील घरांच्या आजूबाजूला, किनाऱ्यावरील मोकळ्या जागांवर, दोऱ्यांवर आणि जाळ्यांवर मासे वाळवले जात आहेत. ही परंपरा फक्त उदरनिर्वाहाचे साधन नसून शतकानुशतके चालत आलेल्या सांस्कृतिक वारशाचा भाग आहे.

कोळी समाजातील महिला. मासे स्वच्छ करणे, वाळवणे, पुन्हा बगी वाजवणे (म्हणजे खवले, काटे वेगळे करणे), आणि नंतर साठवून ठेवणे अशा कामात अहोरात्र गुंतलेल्या आहेत. उन्हाच्या झळा असूनही त्यांचा उत्साह कमी होत नाही. ही मेहनत पावसाळ्याच्या काळात कुटुंबाच्या अन्नसुरक्षेसाठी आणि उत्पन्नाच्या पर्यायासाठी अत्यंत महत्त्वाची आहे.

पुन्हा बगी वाजवण्याची प्रक्रिया सध्या शिगेला पोहोचली आहे. हा एक कौशल्यपूर्ण आणि वेळखाऊ टप्पा असून महिलांच्या अनुभवावर आधारित असतो. सुकट, वाळवलेली बांगडी, वडे, सुकट चटणी यासारख्या पदार्थांची मागणी पावसाळ्यात वाढते. त्यामुळे ही मासळी केवळ घरापुरती मर्यादित राहत नाही, तर स्थानिक बाजारातही विक्रीसाठी येते.ही परंपरा केवळ मासळी साठवण्यापुरती मर्यादित नाही, तर महिलांच्या आर्थिक स्वावलंबनाचा आणि कौटुंबिक आधाराचा एक महत्त्वाचा भाग आहे.



## स्वरतरंगच्या माध्यमातून ग्रामीण भागातील कलाकारांना संधी

**चौक : प्रतिनिधी**

निहाल आणि विहान या स्वरतरंग रंगमंचामुळे ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांना संधी मिळेल, त्यामुळे ग्रामीण भागात अनेक कलाकार उदयास येतील, असे प्रतिपादन चौक व्यापारी असोसीएशनचे अध्यक्ष हर्षल हनुमंते यांनी केले.

चौक येथील ज्येष्ठ रंगकर्मी आणि समालोचक सुदेश महागावकर यांनी निहाल आणि विहान इंटरटमेंट च्या माध्यमातून चौक परिसरातील नवोदित कलाकारांना संधी देण्यासाठी कराओके ट्रॅक आणि कराओके क्लासेस यांची निर्मिती केली असून तिचे उद्घाटन चौक व्यापारी संघटना अध्यक्ष हर्षल हनुमंते यांच्या हस्ते करण्यात आले,

याप्रसंगी त्यांनी चौक येथे नाट्यगृह निर्माण करण्यास मी प्रयत्नशील आहे. सुदेश महागावकर चौक परिसरात, सूत्र संचालन आणि गायक म्हणून कार्यरत आहेत, चौक परिसर आणि ग्रामीण भागातील नवोदित कलाकारांना संधी उपलब्ध व्हावी म्हणून स्वरतरंगची निर्मिती केली असून या माध्यमातून नवोदित कलाकारांना संधी देण्याचा प्रयत्न करणार आहे



## झाडे तोडणीसाठी मंगळवारी महावितरणचे लोडशेडींग

**मुरुड : प्रतिनिधी**

पावसाळ्याचे दिवस जवळ आल्याने मुख्य वाहिनीवरील वाढलेल्या झाडाच्या फांद्या व वाहिनीवरील वाढलेली तृणे काढण्यासाठी मुरूड महावितरणकडून मंगळवारी १३ मे रोजी सकाळी ९ ते सायंकाळी ५ पर्यंत लोड शेडिंग करण्यात येणार आहे.

मुरूड महावितरणने पाभरे मुख्य वाहिनी वरील झाडे तोडणी त्याच प्रकारे मुरुड व ग्रामीण भागातील वृक्ष तोडणी करण्यात येऊन मुख्य प्रवाहाला बाधित करणारी सर्व समस्या सोडवण्यात येणार आहेत.

या बाबत मुरूड महावितरणचे मुख्य कार्यकारी उप अभियंता कृष्णात सूर्यवंशी यांनी सांगितले की, झाडे तोडणी ही पावसाळा पूर्वीची तयारी असून जेणेकरून पावसाळी हंगामात वीज पुरवठा व्यवस्थित ठेवता येणार आहे. सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजे पर्यंत या कामासाठी वीज घालवली जाणार आहे. तरी वीज ग्राहकांनी महावितरणला सहकार्य करावे, असे आवाहन केले आहे.

## माणगाव ग्रामीण पतसंस्थेच्या इंदापूर शाखेचे १५ मे रोजी उदघाटन




**माणगाव : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील माणगाव ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्था मर्या, उतेखोल ता.माणगाव या पतसंस्थेच्या तालुक्यातील इंदापूर शाखेचा उदघाटन समारंभ गुरुवार दि.१५ मे २०२५ रोजी सकाळी ११ वा. शाखा कार्यालय मेहता जनरल स्टोअरच्या समोर,मुंबई – गोवा महामार्ग,इंदापूर याठिकाणी मान्यवरांच्या उपस्थितीत होणार असून या शाखेच्या शुभारंभनिमित्त कार्यालयात श्री सत्यनारायणाची महापूजा सकाळी ११ ते सायंकाळी ५ यावेळेत आयोजित करण्यात आली आहे. तरी सदर कार्यक्रमास सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून तीर्थ, प्रसादाचा लाभ घ्यावा अशी विनंती संस्थेतर्फे संस्थापक ॲड.राजीव साबळे, चेअरमन आनंद यादव व्हा.चेअरमन मदनलाल जैन, संचालक – नरेश राजपूत, नंदलाल दोशी, उदय म्हशेळकर, शांतीलाल जैन, दिलीप जाधव, दिलीप अंबुर्ले, अरुण प्रभाळे, संदिप खरंगटे, संचालिका – किर्ती पुराणिक, दीप्ती मोरे यांच्यासह व्यवस्थापक, कर्मचारी वृंद व स्वल्पबचत प्रतिनिधी यांनी केली आहे.

# विराटचा कसोटी क्रिकेटला अलविदा!

## इंस्टाग्राम अकाऊंटवरून निवृत्तीची भावूक पोस्ट

**मुंबई : प्रतिनिधी**

गेल्या आठवड्याभरात भारतीय क्रिकेट चाहत्यांना दोन मोठे धक्के बसले आहेत. भारतीय संघाचा कर्णधार रोहित शर्माने इंस्टाग्रामवर पोस्ट शेअर करून अचानक कसोटी क्रिकेटमधून निवृत्तीचा निर्णय घेतला होता. क्रिकेट चाहते या धक्क्यातून बाहेर पडणार, त्याआधीच विराटने चाहत्यांना आणखी एक मोठा धक्का दिला आहे. आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून भावूक पोस्ट शेअर करून विराटने कसोटी क्रिकेटमधून निवृत्त होत असल्याची घोषणा केली आहे. विराटच्या या निर्णयामुळे क्रिकेट चाहत्यांना मोठा धक्का बसला आहे.



विराट कोहलीने आपल्या इंस्टाग्राम अकाऊंटवरून पोस्ट शेअर करत कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेत असल्याची घोषणा केली आहे. त्याने आपल्या पोस्टला कॅप्शन देत लिहिले की, टीम इंडियाची कसोटी कॅप परिधान करून मला १४ वर्ष झाली. खरं सांगू तर, हा प्रवास मला कुठे नेईल, याची मला काहीच कल्पना नव्हती. या प्रारुपाने माझी परीक्षा पाहिली, मला घडवलं आणि आयुष्यभरासाठी शिदोरी दिली.

तसेत त्याने पुढे लिहिले की, टीम इंडियासाठी कसोटी खेळणं हे माझ्यासाठी नेहमीच खास होतं. या फॉरमॅटपासून दूर जाण्याचा निर्णय मुळीच सोपा नव्हता, पण योग्य वाटतो. मी या खेळासाठी सर्वकाही दिलं. त्याहून अधिक या खेळाने मला परत दिलं. कृतज्ञ भावनेने भरलेल्या हृदयानं मी कसोटीचा प्रवास थांबवतोय.

रोहित शर्माने कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर विराट कोहलीनेही कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेण्याची इच्छा व्यक्त केली होती, मात्र येत्या जून महिन्यात भारतीय संघ ५ कसोटी सामन्यांची मालिका खेळण्यासाठी इंग्लंड दौऱ्यावर जाणार आहे. हा दौरा पाहता बीसीसीआयने त्याला आपल्या निर्णयावर फेरविचार करण्याची विनंती केली होती, मात्र विराट आपल्या निर्णयावर ठाम राहिला. अखेर आज त्याने १४ वर्षांच्या कसोटी कारकिर्दीला पूर्णविराम दिला आहे. विराटच्या निवृत्तीनंतर अनेक दिग्गज खेळाडूंनी त्याला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### अशी राहिली आहे कसोटी कारकिर्द

विराट कोहलीची कसोटी क्रिकेटमध्ये त्याच्या नावे अनेक मोठ्या विक्रमांची नोंद आहे. विराटने २०११ मध्ये वेस्टइंडिज दौऱ्याहून आपल्या कसोटी कारकिर्दीला सुरूवात केली होती. त्याला कसोटी क्रिकेटमध्ये १२३ सामने खेळण्याची संधी मिळाली. यादरम्यान २१० डावात फलंदाजी करताना त्याने ४६.९च्या शानदार सरासरीने ९२३० धावा केल्या. यादरम्यान त्याने ३० शतकं आणि ३१ अर्धशतकं झळकावली. यादरम्यान नाबाद २५४ धावा ही त्याच्या कसोटी कारकिर्दीतील सर्वोत्तम खेळी ठरली.

# लाईन आळी क्रिकेट प्रिमियर लीगमध्ये अलंकार फाईटर्स प्रथम

**पनवेल : वार्ताहर**

शिवशक्ती मित्र मंडळ, लाईन आळी पनवेलने आयोजित केलेल्या लाईन आळी क्रिकेट प्रिमियर लीग २०२५ अलंकार फाईटर्स प्रथम तर अभिज स्ट्रायकर्स द्वितीय क्रमांक पटकाविला आहे.

शिवशक्ती मित्र मंडळ, लाईन आळी पनवेल लाईन आळी प्रीमियर लिग – २०२५ यंदाचे १० वे वर्ष होते. संघ मालक अलंकार महाजन ह्यांचा अलंकार फाईटर्स प्रथम व उप विजेता संघ ठरला आहे संघ मालक संदीप पाटील ह्यांचा अभी'ज स्ट्रायकर्स हा ठरला आहे. या स्पर्धेसाठी विविध राजकीय पक्षाचे पदाधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार उपस्थित होते. त्यामध्ये प्रामुख्याने चंद्रशेखर सोमण, महेश सावंत, संजय कदम, हेमंत सावंत, दिलीप चंदने, चंदू म्हात्रे, केदार भगत, सुमित झुंजारराव, अभिजित साखरे, आकाश घाटे, शांतनु घरत, शुभम माळी असे अनेक मान्यवर या स्पर्धेचा आनंद घेण्यासाठी उपस्थित होते. आमदार विक्रांत पाटील यांच्या हस्ते या स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा पार पडला.



या वेळी उपस्थित मंडळाचे संस्थापक अध्यक्ष रमेश दादा गुडेकर, मंडळाचे अध्यक्ष संदीप पाटील, उपाध्यक्ष रवी (पिंट्या) गोरे, कार्याध्यक्ष खंडेश धनावडे, कार्याध्यक्ष समीर कदम, सहकार्याध्यक्ष प्रकाश (नानू) वाघे, सहकार्याध्यक्ष प्रविण पोवार, संयुक्त चिटणीस प्रशांत नरसाळे, हिशोब तपासणीस अरुण ठाकूर, खजिनदार संतोष तळेकर, सहखजिनदार अनिकेत जाधव व त्याच बरोबर मंडळाचे सभासद उपस्थित होते. लाईन आळी प्रीमियर लिग ह्या स्पर्धेसाठी लाईन आळी प्रीमियर लिग कमिटीने दिवस रात्र मेहेनत करून ही स्पर्धा यशस्वी रित्या पार पडली.

# आयपीएल : क्वालिफायर आणि फायनल सामन्याचे ठिकाण बदलण्याची शक्यता

**मुंबई : प्रतिनिधी**

भारत आणि पाकिस्तानमध्ये युद्धबंदी जाहीर झाल्यानंतर आयपीएल २०२५ च्या उर्वरित सामन्यांचे वेळापत्रक सोमवारी जाहीर केले जाऊ शकते. असे सांगितले जात आहे की आयपीएलचे उर्वरित सामने १६ किंवा १७ मे पासून सुरू होऊ शकतात. विशेष म्हणजे लीगचा अंतिम सामना कोलकाता व्यतिरिक्त इतर कोणत्याही शहरात खेळला जाण्याची दाट शक्यता आहे.




भारत आणि पाकिस्तानमधील तणावामुळे आयपीएलला स्थगिती देत एका आठवड्याने पुढे ढकलण्याचा बीसीसीआयने निर्णय घेतला होता. दरम्यान, शनिवारी (दि.११) युद्धबंदीची घोषणा झाली. या पार्श्वभूमीवर आयपीएल गव्हर्निंग कौन्सिल सदस्य आणि बीसीसीआय अधिकाऱ्यांनी रविवारी (दि. ११) आयपीएल पुन्हा सुरू करण्याच्या शक्यतेवर चर्चा केली. बीसीसीआयचे उपाध्यक्ष राजीव शुक्ला म्हणाले की, 'बोर्ड योग्य वेळापत्रकावर काम करत आहे. सध्या आयपीएलबाबत कोणताही निर्णय झालेला नाही. बीसीसीआयचे अधिकारी यावर उपाय शोधत आहेत. बीसीसीआय सचिव, आयपीएल अध्यक्ष फ्रँचायझींशी चर्चा करत आहेत, त्यामुळे लवकरच सर्वांना निर्णय कळेल. स्पर्धा लवकरच पुन्हा सुरू करण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.'

आयपीएलच्या सूत्रांनी सांगितले की, लीगची सुरुवात लखनौ सुपर जायंट्स आणि रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) यांच्यातील सामन्याने होईल. यापूर्वी हा सामना लखनौ येथे ९ मे रोजी खेळला जणार होता. दरम्यान, सर्व संघांना त्यांच्या खेळाडूंना परत बोलावण्यास सांगण्यात आले आहे.

सूत्रांनी असेही सांगितले की, हैदराबादमध्ये होणाऱ्या क्वालिफायर १आणि एलिमिनेटरच्या ठिकाणांमध्ये बदल केले जाणार नाहीत परंतु अंतिम सामना कोलकातामध्ये होण्याची शक्यता कमी आहे. अंतिम सामना १ जून रोजी खेळवला जाण्याची शक्यता आहे आणि त्या दिवशी शहरात पाऊस पडण्याची शक्यता आहे. सूत्रांनी सांगितले की, प्लेऑफ टप्प्यासाठी सध्याच्या ठिकाणांमध्ये कोणताही बदल झालेला नाही परंतु पावसामुळे कोलकाता येथील अंतिम सामन्यावर परिणाम होऊ शकतो. अशा परिस्थितीत, अहमदाबादमध्ये विजेतेपदाचा सामना खेळवला जाऊ शकतो.

पीटीआयशी बोलताना बीसीसीआयचे सचिव देवजीत सैकिया म्हणाले की, 'येत्या काही दिवसांत आम्ही फ्रँचायझी, ब्रॉडकास्टर्स, प्रायोजक आणि सामने आयोजित करणाऱ्या राज्य संघटनांशी चर्चा करू. त्यानंतरच लीग सुरू करण्याबाबत निर्णय घेऊ. उर्वरीत सामने पुन्हा सुरू करण्यासाठी, भारत सरकारची मान्यता आवश्यक असेल.'

# कराटे ट्रेनिंग कॅम्प उत्साहात

**उरण : वार्ताहर**

हेरिटेज समर्थ वाडा कर्जत येथे गोशीन रियू कराटे असोसिएशनतर्फे कराटे ट्रेनिंग कॅम्पचे नुकतेच आयोजन करण्यात आले होते. या कॅम्पमध्ये रायगड जिल्ह्यातील विद्यार्थी सहभागी झाले होते.

दरम्यान, या कॅम्पमध्ये स्पोर्ट्स कराटे, सेल डिफेन्स, काता, कुमिते, चाकू,रायफल शूटिंग याचे प्रशिक्षण देण्यात आले. यामध्ये विघ्नेश विशाल पाटील व नेहा विशाल पाटील यांना फस्ट डिग्री ब्लॅक बेल्ट देण्यात आला. तर अंजा माने यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट प्रदान करण्यात आला. इंडिया प्रेसिडेंट सिहान राजू कोळी यांनी या कॅम्पचे आयोजन केले होते.

दरम्यान, या वेळी राकेश म्हात्रे, गोपाळ म्हात्रे, परेश पावसकर, सुलभा कोळी , निकिता कोळी , विघ्नेश कोळी,कृष्णा कोळी तसेच अन्य मंडळी उपस्थित होती.




# वेटलिफ्टिंगमध्ये यश खंडागळेला सुवर्ण

**राजीर (बिहार) : वृत्तसंस्था**

वेटलिफ्टिंगमधील महाराष्ट्राचा सुवर्णपदकाचा धडाका ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धेत दुसर्या दिवशीही कायम राहिला. सांगलीच्या यश खंडागळेने ६७ किलो गटात सुवर्ण'यश' मिळवित आजचा दिवस गाजविला. टेनिस एकेरीत महाराष्ट्राच्या अर्णव पापरकर, ऐश्वर्या जाधव यांनी उपांत्य फेरीत धडक मारली आहे.

राजगीर क्रीडा विद्यापीठाचा परिसरात ही स्पर्धा सुरू आहे. वेटलिफ्टिंग स्पर्धेत पहिल्याच प्रयत्नात सांगलीच्या यशने स्नॅच प्रकारात १२२ किलोची सर्वोत्तम कामगिरी नोंदविली. पाठोपाठ क्लिन अँण्ड जर्क प्रकारातही पहिल्याच प्रयत्नात त्याने १४५ किलो हे सर्वाधिक वजन पेलले. स्नॅच व क्लिन अँण्ड जर्क प्रकारात दुसऱ्या व तिसऱ्या प्रयत्नात अधिक वजन उचलण्यात तो अपयशी ठरला. एकूण २६७ किलो वजनाची खेळी करीत यशने सुवर्णपदकाला गवसणी घातली.

# महाराष्ट्राचा महिला बास्केटबॉल संघ उपांत्य फेरीत

**पाटना : वृत्तसंस्था**

महाराष्ट्र महिला बास्केटबॉल संघाने सलग दोन सामने जिंकून ७ व्या खेलो इंडिया युवा क्रीडा स्पर्धेत उपांत्य फेरीतील धडक मारली आहे.

पाटीलपुत्र क्रीडा संकुलात सुरू असलेल्या बास्केटबॉल स्पर्धेत पहिल्या सामन्यात महाराष्ट्र संघाने केरळ संघाचा ७२–५९ गुणांनी पराभव केला. महाराष्ट्र संघाकडून त्विशा शर्मा २५ गुण, रेवा कुलकर्णी १२ गुण, वैष्णवी परदेशी ११ गुण, आर्या फटांगरे ९ गुण, रिशिता कुलकर्णी ७ गुण, हर्षला पाटील ६ गुण यांनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केले. मध्यंतराला महाराष्ट्राचा संघ ३३ विरुद्ध ३० अशा तीन गुणांनी पिछाडीवर होता. उत्तरार्धात महाराष्ट्राच्या खेळाडूंनी आपला खेळ उंचावत संघाला १३ गुणांनी विजेतेपद प्राप्त करून दिले.

दुसऱ्या सामन्यात महाराष्ट्र संघाने यजमान बिहार संघाचा १०३ गुणांनी धुव्वा उडवत ११८ विरुद्ध १५ असा विजय मिळवला. महाराष्ट्र संघाकडून तन्वी जाधव १९ गुण, रेवा कुलकर्णी १८ गुण, साईशा भगत १८ गुण, वेदिका सिंग १७ गुण यांनी मोलाची कामगिरी बजावली. उद्या महाराष्ट्राचा संघ पंजाब विरुद्ध आपल्या गटातील अंतिम सामना खेळेल. प्रशिक्षिका मुद्रा अग्रवाल तसेच सहप्रशिक्षक शिवछत्रपती पुरस्कार विजेते शत्रुघ्न गोखले यांचे संघाला मार्गदर्शन मिळत आहे. गत तामिळनाडू स्पर्धेत महाराष्ट्राने कांस्य पदक जिंकले होते.

# जिम्नॅस्टिक्स : सारा, अनुष्का, किमया, सनय, कौस्तुभ पदकाचे दावेदार



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्राच्या जिम्नॅस्टिक पथकातून सारा राऊळ, अनुष्का पाटील, शताक्षी टक्के, उर्वी वाघ, किमया कार्ले, यशश्री मोरे,तर मुलांमध्ये सनय किर्लोस्कर आणि कौस्तुभ अहिरे हे खेळाडू ७ व्या खेलो इंडिया युवा स्पर्धा पदकाचे दावेदार आहेत.

जिम्नॅस्टिक या प्रकाराला नवी दिल्लीतील इंदिरा गांधी स्टेडियममध्ये रविवारपासून (दि. ११) सुरूवात झाली. गत खेलो इंडिया स्पर्धेत महाराष्ट्राने संयुक्ता काळे हिने जिंकलेल्या पाच सुवर्णपदकसह एकूण १२ पदके जिंकली होती. या वेळी संयुक्ताचे वय स्पर्धेसाठी असलेल्या मर्यादेपेक्षा जास्त असल्याने ती संघात नाही.

या वेळी ११ मुले आणि ९ मुली असे महाराष्ट्राच्या एकूण २० खेळाडूंचे पथक जिम्नॅस्टिकमध्ये सहभागी झाले आहे. रविवारी झालेल्या पात्रता फेरीत राज्याच्या खेळाडूंनी लक्षणीय कामगिरी केली. मागील वर्षीच्या संघातील किमया कार्ले ही एकमेव खेळाडू यावेळीही खेळत आहे. मागील वर्षी तिने एक सुवर्ण आणि एक रौप्यपदक जिंकले होते.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अँण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे–बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०–२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२–२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com